साप्ताहिक
# माणूस

शनिवार
२५ ऑगस्ट १९७९
७५ पैसे





तराकींच्या
कम्युनिस्ट राजवटीचा
नवा ध्वज

# हा रंगच 'इस्लाम'ला मंजूर नाही...

अफगाणिस्तानवरील
नवी लेखमाला

पृष्ठ....८

# सप्रेम नमस्कार



□ आपल्या अंकात श्री. पोंडा यांचे इंग्रजी लेखकांच्या बद्दल येणारे लेख माहितीपूर्ण व वाचनीय वाटले; परंतु लेखकाने त्या त्या लेखकांची लिहीलेली पुस्तके ४–५ ओळीत दिली तर जास्त बरे होईल असे वाटते. म्हणजे एखादे पुस्तक वाचावयाचे राहिले असल्यास ते वाचता येईल.

१८ जून १९७९ **राजीव नातू**

□ आपल्या लोकप्रिय साप्ताहिकाच्या गेल्या दोन-तीन अंकातील दिल्ली वार्तापत्रे अतिशय मनोवेधक आणि सद्य परिस्थितीचा अचूक वेध घेणारी आहेत. अलीकड घडलेल्या दिल्लीतील घडामोडी सामान्य जनतेवर दूरगामी परिणाम घडवणाऱ्या आहेत. शनिवार दिनांक १८ ऑगस्टच्या अंकातील माणूस प्रतिनिधींनी भूतपूर्व प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांची घेतलेली मुलाखत वाचून काही विचार मनात येतात.

विशेषतः उपरोक्त मुलाखतीत अखेर म्हटले आहे :

‘ जिथे संघटना आहेत तेथे हे गुण नाहीत जेथे हे गुण आहेत तेथे संघटना नाही ’

हे वाचल्यावर एक सकृतदर्शनी अशक्यप्राय व धक्कादायक वाटणारा; परंतु अगदीच असंभवनीय नसलेला असा विचार मनात येऊन गेला. रा. स्व. संघ हा अतिशय शिस्तबद्ध, सेवाभावी, निःस्पृह, देशप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या अनेक भारतवासीयांचा एक मेळा आहे. आपल्या मुलाखतीत लिहिल्याप्रमाणे श्रीमती इंदिरा गांधी आपल्या अलौकिक संघटना चातुर्याने व तडफदार नेतृत्वाने सामान्य जनमानसावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा प्रभावीपणे उठवू शकल्या आहेत. ह्याचे एक उदाहरण म्हणजे सत्तांतरानंतर जनता सरकारने नाही म्हटले तरी त्यांची लोकप्रियता कमी करण्याचे अनेक प्रयत्न केले; पण ते असफल झालेले दिसले. प्राप्त परिस्थितीत रा. स्व. संघाने श्रीमती इंदिरा गांधी यांना आपल्या संघटनेत समाविष्ट करून देशाचे भवितव्य राजकीय, सामाजिक, आर्थिक या सर्व पातळीवर उजळून काढण्याचे प्रयत्न केल्यास या देशाची अधोगती थांबेल असे माझ्यासारख्या सामान्य नागरिकास वाटते.

आणीबाणीची परिस्थिती योग्य रितीने हाताळल्यास ती देशाला हितावहच ठरेल असे निःसंशय वाटते. ह्याच्या पुष्टचर्थ ‘ इंडिया टूडे’च्या १६ ऑगस्टमधील अंकात सार्वजनिक लोकमतामध्ये ७८% लोकमत आणीबाणीच्या बाजूला झुकलेले आहे, हे निःसंशय बोलके आहे. राजकारण हे सदैव बदलत असते– त्यामुळे त्याच्यामध्ये कालचे शत्रू आजचे मित्र होऊ शकतात असे जर आहे, तर रा. स्व. संघाने देशहिताच्या दृष्टीने श्रीमती इंदिरा गांधींच्या अलौकिक गुणांचा व आपल्या शिस्तबद्ध संघटनेचा उपयोग का करू नये ? ह्या संदर्भात श्री. वाजपेयी यांची इंडियन एक्सप्रेस १५ ऑगस्ट च्या अंकातील चंदीगढ येथील मुलाखत वाचनीय आहे. त्यातील एक वाक्य ‘ This party would welcome support from any quarter–even the Cong (I) to throw out this govt. ’

तसेच श्री. गांधी मुंबई येथील मुलाखतीत रा. स्व. संघाबद्दल विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना म्हणाल्या, ‘ ज्या लोकांनी गेल्या दोन वर्षांत त्यांना वाचवले– तेच आता त्यांच्याबद्दल तक्रार करीत आहेत. मी संघाच्या संस्थेविरुद्ध नाही; पण त्यांची हिंदु राष्ट्राची कल्पना– त्यांचा हरिजन–गिरीजन ह्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन याच्या विरुद्ध आहे.

१९–८–१९७९ **सं. वि. देवधर**


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे

अंक : तेरावा

२५ ऑगस्ट १९७९

किमत : ७५ पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

वृत्त विशेष :

# एक औट घटकेचे राज्य

गेल्याच आठवड्यात चरणसिंगसरकार-विरोधी पुण्यात विविध ठिकाणी झालेल्या सभांचा वृत्तान्त 'माणूस'च्या अंकात दिला होता. चरणसिंग ज्या तऱ्हेने सत्तेवर आले, त्याबद्दलचा क्रोध त्या सर्वच वक्त्यांचा भाषणांमधून व्यक्त होत होता. राजकारणातील ही हीन वृत्ती निपटून काढण्याचा आग्रहही 'हिंदुस्थानी आंदोलन'चे निमंत्रक श्री. मधू मेहता यांच्यापासून तर सुप्रसिद्ध साहित्यिका दुर्गाबाई भागवतांपर्यंत सर्वांनीच त्या वेळी धरला होता; परंतु या प्रयत्नांचं फळ इतक्या लवकर पदरी येईल अशी मात्र यांचीही अपेक्षा नसेल.

२० ऑगस्टला विश्वासदर्शक ठराव लोकसभेमध्ये चर्चेला येण्यापूर्वीच दिल्लीमध्ये जबरदस्त राजकीय घडामोडींना प्रारंभ झाला. त्या दिवशी सकाळीच या विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधी मतदान करण्याचा निर्णय इंदिरा काँग्रेसने घेताच चिखलाचे कुल्ले लावून उभं राहिलेलं चरणसिंगांचं सरकार खाली कोसळलं आणि भारतीय राजकारणाला पुन्हा एक नवं वळण मिळालं. हे वळण कसं असेल, त्यातून काही चांगलं निष्पन्न होईल का, की देश अधिकच वेगाने अराजकाकडे वाटचाल करू लागेल, हे सर्व भविष्यातील प्रश्न आहेत; पण या निमित्ताने पुन्हा एकदा वैयक्तिक स्वार्थ आणि महत्त्वाकांक्षेपोटी दगलबाजी व संधिसाधूपणा करून खुर्ची बळकावू पाहणाऱ्यांना एक चांगला धडा मिळाला आहे आणि परिस्थितीची irony अशी की, एके काळी भारताच्या जनतेकडून हा धडा शिकणाऱ्या व्यक्तीनेच तो आता चरणसिंग आणि त्यांच्या बगलबच्च्यांना शिकवला आहे. तसंच गेल्या पंधरा दिवसांमध्ये या सरकारचं पितळ उघडं पाडण्याची एकही संधी इंदिराजींनी गमावली नव्हती, हेही या संदर्भात लक्षात घेणं महत्त्वाचं आहे.

चरणसिंगांबरोबरच त्यांच्या अनुयायांनी आणि चाहत्यांनीही डोळे उघडण्याची वेळ आता आली आहे. चरणसिंग-किसानका बेटा, चरणसिंग व्यक्ती नाहीत, ते एक विचार आहेत, अशा भोळसट किंवा भोंदू घोषणा रूढ करू पाहणाऱ्यांनी चरणसिंगांच्या गेल्या महिनाभरातील वर्तनाचंही या निमित्तानं पुन्हा एकदा विश्लेषण करून आपली मतं ठोकून घेणं आवश्यक झालं आहे. कारण कुठल्या व्यक्तींना आपण काय स्थान देत होतो, हे लक्षात येणं फार महत्त्वाचं असतं आणि दर वेळी चुका सुधारण्याला संधी मिळत असतेच असं नाही.

चरणसिंगांप्रमाणेच आणखी एका व्यक्तीला या घटनेमुळे तिच्या योग्यतेचे स्थान मिळालं आहे. ती व्यक्ती म्हणजे यशवंतराव चव्हाण ! त्यांना जर थोडा जास्त अवधी मिळाला असता तर त्यांनी सबंध जनता पक्ष पोखरून काढला असता. Fence-Sitter म्हणून चव्हाणांना निकालात काढणं अविचाराचं ठरेल. कारण वरवर जरी निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्याजवळ नाही असं वाटलं तरी सूक्ष्म पातळीवर त्यांच्या कृतीमध्ये नेहमीच फार मोठी दगलबाजी दडलेली असते. १९६९ सालच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीपासून गेल्या दहा वर्षांमधील अनेक राजकीय घडामोडींनी हे सिद्ध केलेलं आहे. आतासुद्धा गृहखातं मिळाल्यावर चव्हाणांनी संघाबद्दल जो फतवा काढला तो पाहण्यासारखा आहे. त्याद्वारे त्यांनी एकाच वेळी संघवाल्यांनाही खूष ठेवलं आणि संघविरोधी 'पाऊल' उचलल्याबद्दल तथाकथित पुरोगाम्यांचाही दुवा घेतला. अशी माणसं जास्त धोकेबाज असतात.

इंदिराजींनी आपण जगजीवनरामांना पाठिंबा देणार की नाही, याबद्दल आज जरी काही सांगितलं नसलं तरी तूर्त तरी त्या पाठिंबा देणंच अधिक पसंत करतील. त्याचे उद्देश चार. १) इतर पक्षांप्रमाणेच निवडणुकांच्या तयारीसाठी थोडा अवधी मिळाला तर तो इंदिराजींनाही हवाच आहे. २) पुन्हा एकदा भारतीय राजकारणाच्या दोऱ्या त्यांच्या हातात राहतील. ३) शक्य झालं तर कालांतराने जगजीवनरामांना दिलेला पाठिंबाही काढून घेऊन चरणसिंगांप्रमाणे त्यांनाही expose करता येईल. ४) या देशाला सध्याच्या परिस्थितीत माझ्याव्यतिरिक्त दुसरा कोणीही नेतृत्व आणि स्थिर शासन देऊ शकणार नाही, हे साऱ्या जनतेला गर्जून सांगता येईल.

अर्थात हे न ओळखण्याइतके जगजीवनराम मूर्ख नाहीत. गेल्या चार वर्षांमध्ये ज्यांनी ज्यांनी इंदिराजींना दगा दिला आहे त्यांचा वचपा काढण्याची कोणतीही संधी त्या दवडणार नाहीत आणि ७७ च्या निवडणुका फिरवण्यात जगजीवनरामांचा असलेला वाटा कोणीही नाकारणार नाही. त्यामुळे जगजीवनरामही जितक्या जास्त प्रमाणावर आणि जितक्या लवकर इंदिराजींच्या पाठिंब्याची कुबडी टाकून देतील तितके ते त्यांना स्थिरतेच्या दृष्टीने फायदेशीर होणार आहे.

परंतु जगजीवनरामांना ही संधीच न देता राष्ट्रपतींनी जर मध्यावधी निवडणुकाच जाहीर करून टाकल्या तर मात्र सर्वच राजकीय पक्षांपुढे मोठं प्रश्नचिन्ह उभं राहील. कारण आज मतदारांसमोर जाण्याची कोणाचीच इच्छा नाही, हिंमत नाही. फक्त इंदिराजीच या निवडणुकांचं स्वागत करतील. कारण She has nothing to lose.

शेवटी एक योगायोग मात्र नोंदवून ठेवण्यासारखा आहे. अविश्वासाच्या ठरावाला तोंड देण्यापूर्वीच एका पंतप्रधानाने इथे राजीनामा दिला आणि त्याच्यानंतर आलेल्या

पंतप्रधानालाही स्वतःच मांडलेल्या विश्वासदर्शक ठरावावर चर्चा होण्यापूर्वीच आपलं स्थान सोडावं लागलं आणि तेही केवळ तीन आठवड्यांच्या आत ! ! ❋

## टी. व्ही. तर्फे चर्चासत्र

मुंबईच्या दूरदर्शनतर्फे 'दूरदर्शनवरील नाटके' या विषयावर एक चर्चासत्र नुकतंच पुण्यामध्ये आयोजित करण्यात आलं होतं. पुण्या–मुंबईतील सुमारे चाळीस लेखक, दिग्दर्शक, प्रेक्षकांनी या चर्चासत्रात भाग घेतला.

चर्चासत्राच्या उद्घाटनाच्या वेळी फिल्म इन्स्टिटयूटचे संचालक एन्. व्ही. के. मूर्ती यांचा विषयाला धरून काही मुद्दे श्रोत्यांच्या विचारार्थ पुढे ठेवण्याचा प्रयत्न नाटय परिषदेचे अध्यक्ष भालबा केळकर यांनी नंतर उत्कृष्टपणे हाणून पाडला. 'मी नाटयपरिषदेचा यंदाचा अध्यक्ष आहे म्हणून मला इथे बोलावण्यात आलं आहे. अन्यथा आज माझ्या जागी या ठिकाणी दुसरा कोणी तरी असता ... ' अशी संयोजकांना अडचणीत आणणारी सुरवात करून त्याच लाइनवर भालबा दोन–पाच मिनिटे फुटकळ उपरोधिक विनोद करत राहिले. एकंदरीत हे पद आहे म्हणून मी मोठा, अन्यथा माझ्याकडे कोणी वळलं नसतं, ही जाणीव स्वतःला आणि इतरांना करून देण्याचा प्रयत्न हल्ली भालबा वारंवार करत असतात. आता हे सांगायला भालबा कशाला हवेत ? पण त्यांनी तो उद्योग इथेही केलाच. इतर त्यांच्याजवळ फार काही बोलण्यासारखं नव्हतंच, हे नंतर लक्षात आलं. प्राध्यापकाला शोभणार नाही अशा इंग्लिशमध्ये आणखी पाच मिनिटं काही तरी बोलून भालबा खाली बसले. उद्घाटनाचा नाटकी कार्यक्रम पार पडल्यावर खऱ्या चर्चासत्राला सुरुवात झाली.

'My Concept of a T. V. Play' या विषयावर प्रा. वसंत कानेटकर, डॉ. आदी मर्झबान आणि श्री. श्रीवास्तव हे तिघंजण बोलणार होते. डॉ. मर्झबान यांनी एक-दोन मुद्दे अतिशय चांगले मांडले. टी.व्ही. वरील नाटके भावनाप्रधान असली पाहिजेत, असा त्यांचा विशेष आग्रह होता. नंतर प्रा. वसंत कानेटकर बोलायला उठले. आजच्या कार्यक्रमात विषयाला फारसा स्पर्श न करता बोलून संयोजकांना आपल्याला बोलावल्याबद्दल पश्चात्तापच करायला लावायचा, असा बहुधा भालबा आणि कानेटकरांचा आधीच करार झाला असावा. 'टी. व्ही. वरील नाटकांविषयीची माझी कल्पना' यावर एक अक्षरही न बोलता आवाज चढवून, घाणेरड्या इंग्लिशमध्ये कानेटकर टी. व्ही. वाल्यांनाच धोपटू लागले. अगदी टी. व्ही. ला नाटक देणं म्हणजे wastege असतं, असं म्हणण्यापर्यंत कानेटकरांची मजल गेली आणि त्याच्या मागल्याच आठवड्यात कानेटकरांचं 'प्रेमा तुझा रंग कसा ?' टी. व्ही. वर झालं होतं. आता हे नाटक त्याच पातळीला आलं आहे, असं कानेटकरांचं म्हणणं असलं तर काही प्रश्न नाही, अन्यथा टी. व्ही.ला नाटक देणं म्हणजे wastage असतं हे पूर्णपणे मनाला पटत असूनही कानेटकर स्वतःही ते का करतात, हे समजू शकत नाही. कानेटकरांनंतर आलेल्या श्रीवास्तव यांनी मात्र पुन्हा चांगले मुद्दे मांडले. टीं. व्ही. वरील नाटक हे रंगमंच आणि रुपेरी पडदा या दोन्हींच्या मिश्रणातून जन्माला आलं आहे; पण त्याच्यामध्ये या दोन्हींमधील वाईट बाबी येऊ नयेत, अशी अपेक्षा श्रीवास्तव यांनी या विषयावर बोलताना व्यक्त केली.

या सबंध चर्चेत जाणवलेले दोन महत्त्वाचे मुद्दे म्हणजे हे तिघेही वक्ते हिंदी, गुजराती आणि मराठी नाटकांपैकी कोणत्या तरी दोन भाषांवरील नाटकांबद्दल बोलू शकत होते. कारण प्रत्येकालाच या तीनपैकी एखादी तरी भाषा येत नव्हतीच. शिवाय हा विषय फारसा गंभीरपणे कोणीच घेतल्यासारखा वाटला नाही. कारण टिपणं कोणीच काढली नव्हती आणि टिपणं न काढता अशा विषयावर बोलायलाही हरकत नाही; पण मग त्यासाठी आवश्यक ती तयारीही नव्हती. कानेटकर तर व्हायलन्ट मूडमध्येच होते; पण मर्झबान आणि श्रीवास्तव यांनीही एक-दोनच विचार करण्यासारखे, विचार करायला लावणारे मुद्दे मांडले. कदाचित या तीनही वक्त्यांना बोलण्यासाठी दिला गेलेला अपुरा वेळ हे याचं एक कारण असू शकेल.

थोडक्यात, एक चांगला कार्यक्रम चुकीच्या संयोजनामुळे वाया गेला.

–प्रतिनिधी


# टॉलस्टॉय – एक माणूस

**लेखिका : सौ. सुमति देवस्थळे**

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## मा. राज्यपालांकडे फराळास....

। सत्यमेव जयते ।
महाराष्ट्राचे राज्यपाल
आणि
श्रीमती शांती सादिक अली
श्री. दि. बा. मोकाशी आणि श्रीमती मोकाशी यांस बुधवार दिनांक १५ आगस्ट १९७९ रोजी संध्याकाळी ७–०५ वाजता राजभवनमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या उपाहारास आमंत्रण देत आहेत.
वेष
नागरिक : औपचारिक सेनाधिकारी : वेष क्र. २ किंवा तत्सम (सन्मान पदकांसहित)

ही निमंत्रण पत्रिका १५×१२ सें. मि. आकाराच्या पांढऱ्या कार्डावर, एका बाजूला इंग्रजी व एका बाजूला मराठी आणि वर अशोक स्तंभाची मुद्रा व खाली मजकूर अशी काळ्या शाईत छापली होती. इंग्रजी व मराठी पत्रिकेंत एकच अंतर होतं. इंग्रजी-बाजूच्या डोक्यावर ' इन सेलिब्रेशन ऑफ इंडिपेंडन्स डे 1979 अशी ओळ होती. राज्यपालांच्या माणसानं हे निमंत्रण आम्हाला घरी येऊन दिले. यादींतील आमच्या नावावर त्याने आमची सही नेली.

निमंत्रण पत्रिकेचा आकार–शाई वगैरे किरकोळ तपशील देण्याचे कारण राज्यपालाच्या या निमंत्रणाचे आम्हाला वाटणारे कौतुक हे आहेच पण अशा निमंत्रणाचे कुतुहल असलेल्या असंख्य नागरिक बंधूभगिनींसाठीही हा तपशील आहे.

कदाचित या समारंभास आम्ही गेलोही नसतो. कारण बहुतेक सरकारी समारंभास विशेष पोषाख लागतो. सरकारी नोकर असा पोषाख ठेवतात. पण व्यवसायांतील माणसाजवळ असा पोषाख नसतो. एवढेच काय जिथे ' प्रोटोकॉल ' संभाळावे लागतात तिथे त्याला गुदमरल्यासारखे होते. अमुक एक तऱ्हेचाच पोषाख घालून यावयाचा अशा-तऱ्हेच्या गोष्टी तो टाळतो. एका समारंभासाठी राष्ट्रीय पोषाख शिवावयाचे त्याच्या जीवावर येते. निमंत्रणात, साधा पोषाख चालेल असे असल्याने आम्ही समारंभास जावे असे ठरविले.

राज्यपालांकडील समारंभास जाण्याची भीति आणखी एका कारणानं गेली. निमंत्रणाच्या कार्डावर वेळ दिली होती त्या जागेवर चिठ्ठी डकवून ७–०५ अशी वेळ लिहिलेली होती. आमच्या घरच्या निमंत्रणात असे घोटाळे होतात व आम्हाला अशीच चूक दुरूस्त करावी लागते. आपल्याचसारखा चुका करणारा माणूस पाहिला कीं बरे वाटते तशी ही दुरूस्ती पाहून आम्हाला वाटले. मग आम्ही वरची डकवलेली चिठ्ठी हळूच चोरून पाहिली. खाली ६–०५ अशी वेळ होती. एक कुतुहल शमले की दुसरे सुरू होते माणसाचा हा स्वभावच आहे. ६–०५ ची वेळ ७–५ का केली असेल असे विचारचक्र सुरू झाले. समारंभाचे वेळी एकाने उलगडा केला. पंधरा ऑगस्टच्या सकाळी वर चढलेला राष्ट्रध्वज ७–०५ ला खाली घेतात. तो खाली घेऊन लगेच फराळाचा समारंभ सुरू करणं बरोबर होतं. म्हणून वेळ बदलली असावी.

आम्ही वीस मिनिटे आधी राजभवनात पोहोचलो. मी माझी बायको, प्रपंचचे संपादक माधव कानिटकर व त्यांची बायको असे चौघेजण टॅक्सीत होते. राजभवनाच्या उंच कुसाशी आलो. एक दारावर ' अॅट होम ' असा फलक होता. कोपऱ्याच्या दारानं आवारांत जावयाचं या विचारात असता रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या पोलिसाने आम्हाला पुढे फाटक आहे अशी खूण केली. मग अंतराअंतरावर ठेवलेले पोलिस आम्हाला मार्ग दाखवीत राहिले. थोडाथोडा पाऊस पडू लागला होता. हवेत गारठा वाटू लागला होता. दिवे मंद वाटत होते. राजभवनाच्या आंगणांत शिरताच तेथील झाडीमुळे गारठा वाढला. दिवे आणखी मंद झाल्यासारखे वाटले. मार्गदर्शन करणाऱ्या पोलिसांच्या हाताच्या पांढऱ्या बाह्या अर्ध प्रकाशात उठून कळत होत्या. आमची टॅक्सी थांबली. आम्ही खाली उतरलो. आम्हाला एक नंबर देण्यात आला. टॅक्सी मागे वळली,

आम्हाला अदबीने समारंभाचे स्थळ दर्शविले गेले. मांडवाचे प्रवेशद्वार रंगीत दिव्यांनी सजवले होते. बाजूच्या झुडुपांवर रंगीत दिवे टाकले होते. त्यात लाल व हिरवे रंग होते. मधेच एखाद्या झाडावरहो ते सोडले होते. ह्या दिव्यांत पांढरे दिवे नसल्याने भडक उजेड नव्हता. प्रकाशानं काळोखाला घेरण्याऐवजी काळोखाने प्रकाशाला घेरले होते. त्यामुळे नकळत पावले संथ पडून वातावरणाला गंभीरपणा येत होता. पायघड्या घातल्या आहेत अशा संथ पावलांनी समारंभाच्या मांडवात म्हणजे शामियान्यात आम्ही प्रवेश केला.

ज्यांना स्वातंत्र्याचा पहिला पंधरा ऑगस्ट अस्पष्ट आठवत असेल त्याला त्या दिवशीचा पाऊस आठवेल. मला वाटते त्या दिवशी अतिशय पाऊस होता. मुसळधार नसला तरी झाकळून येऊन पुण्याच्या पद्धतीचा होता. आपल्याकडे अशी समजूत आहे की, काही काही दिवशी पाऊस येतोच. उदाहरणार्थ होळीच्या दिवसांत होळी विझवावयास पाऊस येतो. आषाढी एकादशीला पाऊस येतो. त्या समजूतीत हळूहळू पंधरा ऑगस्टला पाऊस येतो ही समजूत जाऊन बसणार असे दिसू लागले आहे. त्या वेळा स्वातंत्र्य घेण्यास अशुभ दिवस निवडला. असा ओरडा झाला होता; पण पंधरा ऑगस्टच्या समारंभाचा मांडव भिजविण्यास पाऊस येणार असेल तर तो मुहूर्त शुभ धरावयास हवा. तसा पाऊस आला तरच ' सुजला-सुफ 'ला हे राष्ट्रगीतांतले शब्द खरे ठरतील.

समारंभाचा मांडव तंबूवजा आणि काटकोनांत होता. आत शिरताच डाव्या हातास लांबलचक टेबल फराळाच्या पदार्थांनी सज्ज होते. हे टेबल तंबूप्रमाणेच पन्नास फुटानंतर डाव्या हाताला वळल्यावर पुन्हा पंचवीस एक फूट पसरले होते व त्यावरही पदार्थ मांडले होते. आम्ही आत गेलो तेव्हा पाचपचवीस मंडळी आली होती; आम्ही आधाशासारखे आधी आलो असे राज्यपालांना वाटेल की

काय अशी आम्हास भीती वाटली; पण आमच्या मागोमाग भराभर निमंत्रित जोडपी आली. त्यात राजभोज सपत्निक होते. माझी आणि त्यांची काही दिवसांपूर्वीच ओळख झाली होती. नंतर आलेल्या मामासाहेब मोहोळांशी काही बोलणे चालू असता मी पुढे गेलो आणि मंडपात एक फेरी मारून कोणी परिचयाचे आले आहेत का पाहून आलो. मी दुरून गुलाबवेडे डॉ. हर्डीकर जोडपं पाहिलं. थोडा वेळ माधव वझे व सौ. वझे यांच्याशी उभा राहून त्यांनी बरोबर आणलेल्या फ्रेंच पाव्हण्याशी ओळख करून घेतली. जरा वेळानं आमदार अरविंद लेल्यांना नमस्कार केला. तेवढ्यात माझ्या पत्नीला तिची एक मैत्रीण भेटली. सौ. इनामदार त्यांचे यजमान प्रा. इनामदार हे युनिव्हर्सिटीत एका डिपार्टमेंटचे हेड आहेत. आणि सौ. इनामदार या माझ्या पत्नीप्रमाणेच पंढरपूरच्या असल्यानं पंढरपूर माहेरवासिणीचे जे मंडळ आहे त्यांत त्या दोघी आहेत. तेथेच एस. पी. कॉलेजचे प्रिन्सिपॉल यांच्या पत्नी यांच्याशी ओळख करून झाली, बहुतेक सगळे आमच्याच सारखे करताना दिसत होते. जरा थांबायचं ओळख करून घ्यावयाची, ओळखीचा दूर दिसला की लांबून हात वर करावयाचा.

आता मांडव गच्च भरला. माझी बायको म्हणाली तसा इंटिमेटचा सुवास सर्वत्र दरवळला होता. तिने तिचे आणखी एक निरीक्षण सांगितले. तेथे आलेल्या नव्याण्णव टक्के स्त्रिया प्युअर सिल्कच्या साड्या नेसून आल्या होत्या. पुरुष काही इव्हिनिंग ड्रेसमध्ये होते. मिलीटरी व नेव्ही दोन्हीकडचे अधिकारी होते. विमानदलाचेही असावेत. काही अधिकाऱ्यांनी छातीवर मेडील्स लावलेली होती. एकूण अगदी भिन्न भिन्न तऱ्हेचे लोक, जे कुठे एकत्र येण्याचे कारण नव्हते ते इथ आलेले दिसत होते. युरोपियन, अमेरिकन, निग्रो, सयामी परदेशीही दिसत होते. ◻

जो तो घड्याळाचे मनगट वर करून बघू लागला. सात वाजून तीन मिनिटे, चार मिनिटे, हळूहळू झिरो अवर जवळ आला. मांडवाबाहेर उजव्या हातास दोन उंचावलेल्या जागेवर दोन बॅन्ड बसले होते. एक मिलिटरी व दुसरा पोलिस बॅन्ड होता. त्या पलिकडे राज्यपालांचा बंगला होता. सर्वांची नजर बंगल्याकडे जाणाऱ्या रस्त्याकडे लागली. बॅन्डवाले उठून उभे राहिले. ज्या झुडुपाआड बंगल्याचे दार लपले होते त्या झुडुपाआडून राज्यपाल व त्यांच्या सौभाग्यवती येऊ लागले. बरोबर दोन पट्टेवाले, मागे मिलीटरीचा अधिकारी. राज्यपाल जोडपं हळूहळू पावले टाकीत पुढे येऊ लागलं. राज्यपालांच्या पत्नीनं कोणतं पातळ नेसलाय याकडे याकडे सर्व स्त्रियांच्या नजरा लागल्या असाव्यात. बिचारे राज्यपाल साध्या राष्ट्रीय पोषाखात होतं. राज्यपालांच्या पत्नीनं जरीचं पातळ नेसलं होतं आणि गर्द रंगाचं होतं एवढंच मला सांगता येईल. राज्यपाल जोडपं मंडपापासून दहा हातावर येताच बॅन्डमधून जनगणमन सुरू झाले. राज्यपाल, त्यांच्या पत्नी आणि आम्ही सर्वच तिथल्या तिथे स्तब्ध उभे झालो. आम्हा मंडळीत ज्याचं तोंड जिकडे होतं तिकडेच ठेऊन जो तो हात बाजुला ताठ ठेऊन उभा राहिला.

जनमन संपताच उरलेली पावले चालून राज्यपाल जोडप्यांनी मंडपात प्रवेश केला. त्या क्षणापासून त्यांच्याभोवती इतके लोक झाले की आम्हाला अगदी शेवटी शेवटी त्यांचे दर्शन झाले. मात्र राज्यपाल जोडपं आत येताच फराळाला सुरुवात करण्याची अनुमति मिळून आम्ही मुख्य कामाकडे म्हणजे फराळाच्या टेबलांकडे वळलो.

कोणताही पदार्थ न घेता कांही वेळ आम्ही निरीक्षण केले. ज्याने त्याने किंवा जिने तिने तेथील तशी उचलून हवे ते पदार्थ बशीत घेऊन खावयाचे होते. खाण्याच्या पदार्थात, गुलाबजाम, कांही वेळाने आम्हाला ज्याचे नाव कळले तो जिलबीसारखा ' इमरती ' नावाचा पदार्थ, चटणी सँडविच, सामोसे, चार तऱ्हेचे केक व चहा आणि कॉफी इतक्या गोष्टी होत्या. हात पुसण्यास कागदाचे छोटे नॅपकिन ठेवले होते. एकूण मेनू छान होता. खाऊन झाल्यावर टेबला पलीकडच्या नोकरांच्या हातात रिकाम्या बशा देऊन आम्ही चहा कॉफीकडे वळलो. तेथील माणसं कोरी चहा, कॉफी ओतून देत होती. व आपण तेथेच ठेवलेली दूधसाखर आपणास आवडते तेवढी घालून चहा कॉफी तयार करून घ्यावयाची होती. हे सर्व मुद्दाम अशासाठी दिले आहे की जे आमच्यासारखे नवसे पुढच्या समारंभास जातील त्याना रिकामी झाल्यावर उष्टी बशी कुणाकडे द्यावयाची व चहा कॉफी कशी करून घ्यावयाची हे सर्व कळावे. या साध्या साध्या गोष्टी न कळल्यामुळे आपल्यासारख्या साध्या नागरिकांचे उगीचच हसे होते. ते टळावे. अर्थात यंदा झालेले हे ज्ञान आम्हाला पुढच्या वर्षी उपयोगी पडणार आहे असे वाटते. कारण असे ऐकले की निमंत्रणाच्या यादीवर एक नाव तीन वर्षे राहते. बघू या.


आता तास होत आला होता. हळूहळू एक एक निमंत्रित जोडपं मांडव सोडू लागलं. यावेळी राज्यपाल जोडपं आम्हाला पाय उंच करून पहावयास मिळालं. मला वाटते, आमचे मित्र श्री. नूलकर हे कोणा परदेशी यांचा राज्यपालाना परिचय करून देत होते. आमचा आणि आमच्यासारखा अनेकांचा राज्यपालांशी परिचय झाला नाही हे जरा विचित्र वाटले. आणि जिथे आपण संकोच न करिता खाल्ले तिथे यजमानांशी ओळख व्हावयास हवी होती. एकतर राज्यपालांनी परिचय पद्धतीत काही बदल करायला हवा किंवा आम्ही तरी गर्दीतून घुसून राज्यपालांशी परिचय करून घ्यावयास शिकायला हवे. त्याहीपेक्षा राज्यपालांनी मंडपात आल्यावर स्पीकरवर ' मी आपले सर्व निमंत्रित बंधुभगिनींचे स्वागत करितो. आपण फराळास आरंभ करावा असे काही तरी बोलले तर सर्वानाच खाताना बरे वाटेल. नाहीतर रितीभातीत, स्वागतात, कुठेही दोष नसलेला हा समारंभ जो अतिशय कोरडा वाटतो तो वाटणार नाही.

मांडवात लावलेल्या दुधी बल्बाच्या संथ सावलीहीन प्रकाशातून आम्ही मांडवाबाहेर आलो. बाहेर काही अंतरावर उभ्या असलेल्या व्यवस्थापक पोलिसांनी आम्हाला दिलेली नंबराची चिठ्ठी मागून घेतली व आम्हाला तिथे उभे राहण्याची विनंति करून एकाने मायक्रोफोनवर आमचा नंबर आमच्या टॅक्सीचा नंबर सांगून आमची टॅक्सी आत बोलावली. दोन मिनिटांत आमची टॅक्सी आमच्यापुढे येऊन उभी राहिली. एका अधिकाऱ्याने टॅक्सीचे दार उघडून अदबीने आम्हाला आत बसविले. टॅक्सी परतीचा प्रवास करू लागली.

टॅक्सी राज्यपालांच्या बंगल्याचे आवार सोडून, मुख्य रस्त्यावर येऊन पावसाचा वारा लागताच आमची समारंभाची धुंदी उतरली. आम्ही घरापासून निघून तेथे थांबून परत येण्याच्या कराराने टॅक्सी ठरवली होती. समारंभाची धुंदी उतरताच प्र. के. अत्रे यांच्या सुप्रसिद्ध विनोदातील नायकासारखा मी दचकलो. अत्र्यांचा हा नायक नवविवाहित पत्नीला घेऊन मोठ्या जोराने टॅक्सी करून निघाला. टॅक्सीत बसल्यावर त्या नवपरिणित वधूनं टॅक्सीच्या मागच्या सीटवरच्या अंधारात पतीच्या खांद्यावर मान टेकली. त्याचा हात धरला व तोही आपल्याला जवळ घेईल या अपेक्षेत ती राहिली; पण तिच्या नव्या नवऱ्याचे लक्ष टॅक्सीच्या मीटरकडे होते.

माझेही आता तेच झाले. राज्यपालांकडचे फराळाचे बोलावणे आले, छाती फुगली, त्या जोरात टॅक्सी ठरवली आणि आता समारंभ संपल्यावर त्याचा जोर ओसरताच झणकन ' टॅक्सीचे काय बील होणार ?' हा प्रश्न डोक्यात सणकला. जरा वेळ हिशेब करीत होतो. पत्नी काही बोलत होती, विनोद करीत असावी; पण लक्ष मीटरकडे होते. मग एकदम लक्षात आलं की, आपण ' संध्याकाळचे पुणे ' या सदरासाठी हे लिहिणार आहोत. तेव्हा टॅक्सीचे बील संपादकांच्या टेबलावर टाकण्यास काहीच हरकत नाही. ते त्यांनीच दिले पाहिजे. हा विचार येताच, बायकोचे बोलणे ऐकू येऊ लागले. तिने पुन्हा विनोद केला होता. या वेळी मात्र मी खळखळून हसलो. ◻

# ही बँक... तुमचीच



अच्छा ··· या, या, तुम्ही देखील या ···
पैशाला पाय फारच फुटताहेत असं वाटतय ? असं करा ना ··· बचतीला उत्तेजन देणाऱ्या कितीतरी आकर्षक योजना आमच्याजवळ तयार आहेत ···

या. . . या. . . अगदी संकोच करू नका.
तुमचे दागिने, कागदपत्र सांभाळायचेत ना ? त्यासाठी आमच्या सेफ डिपॉझिट लॉकर्सचा वापर करा.

तुम्हाला काय हवय म्हणता ? कर्ज हवय ? देऊ की . . . अगदी आनंदानं । कर्ज कशासाठी हवय, ती योजना व्यवस्थितपणे आमच्या समोर मांडा म्हणजे त्यावर विचार करून योग्य निर्णय घ्यायला आम्हालाहि सोपं जाईल आणि तुमचंही काम होईल.

लोक मंगल ··· आवर्त ··· शुभमंगल ···
सदाफुली... कोणत्याही योजनेत सामील व्हा. अन् तुमचा व्यवसाय काय म्हणतोय? छान चाललय ना सारं ? 'यत्न तो देव जाणावा' हे पटतं बुवा तुमच्याकडे पाहून ··· तुमच्या प्रगतीला हातभार लावता आला म्हणून खूप समाधान वाटतय आम्हाला.

या ··· सारे या... स्वागतम्... सुस्वागतम्
ही बँक तर तुमचीच आहे... जिव्हाळ्याची ।

**बँक ऑफ महाराष्ट्र**

( भारत सरकारचा उपक्रम )
मुख्य कार्यालय : पुणे ४११ ००२.

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

PRATIBHA 78-136

# आदिवासी

## वा. दा रानडे

जमीन सुधारणांबाबत भूमिहीन, आदिवासींना जमिनी देण्याबाबत आणि असलेल्या जमिनी त्यांच्याकडेच राहतील याबद्दल सरकारला खरोखर आस्था आहे का? जमीन सुधारणांच्या अंमलबजावणीत जनता सरकारनी काँग्रेसपेक्षा पुढे पाऊल टाकलेले नाही. इंदिरा गांधी आणि त्याचा पक्ष स्वतःला आदिवासींचे कैवारी असण्याचा दावा करतो पण त्यांचे सरकार असलेल्या आंध्रप्रदेशच्या खम्माम जिल्ह्यात काय परिस्थिती आहे याची मद्रासच्या 'हिंदू' दैनिकाचे विजयवाडा वार्ताहराने एका वार्तापत्रात दिलेली माहिती बोलकी आणि बरेच काही सांगून जाणारी आहे.

दोष केवळ सध्याच्या सरकारचा नसून त्यापूर्वीची सरकारेही या परिस्थितीला जबाबदार आहेत. स्वातंत्र्यापूर्वीच्या काही दशकापासून पूर्वीच्या हैदराबाद संस्थानातील आदिवासींच्या वस्तीचे काही भाग अनुसूचित जमातीचे म्हणून जाहीर करण्यात आलेले आहेत. आदिवासींची पिळवणूक बिगर आदिवासींनी करू नये, त्यांच्या जमिनी त्यांनी बळकावू नयेत यासंबंधी अनेक नियम व कायदे स्वातंत्र्यपूर्वकाळापासून करण्यात आले. पण प्रत्यक्षात काय घडले? खम्माम जिल्ह्याचे कलेक्टर डी. सुब्बाराव यांनी याबाबत केलेल्या अंदाजावरून असे दिसून येते की आदिवासींची किमान दोन लाख एकर जमीन बिगर आदिवासींकडे हस्तांतरित झालेली आहे. आणि एक लाख एकर सरकारी जमीनही बिगर आदिवासींनाच मिळाली आहे.

जमीन हस्तांतर नियमांच्या मूळ उद्देशाप्रमाणे बिगर आदिवासींनी बळकावलेली जमीन तिच्या मूळ मालकाकडे म्हणजे आदिवासींकडे हस्तांतरित करण्याचा कार्यक्रम धडाडीने हाती घेण्याचे कलेक्टरांनी ठरविले आहे. पण या निर्णयाची नुसती कुणकुण लागताच जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली. बिगर आदिवासींच्या एका जमावाने कोठागुडमच्या सब कलेक्टरांना बुरगुमपहाड येथे १६ जुलैला सकाळपासून संध्याकाळपर्यंत घेरावो घातला. टेलिफोनच्या तारा तोडल्या आणि त्यांच्या जीपची मोडतोड केली. त्यापूर्वी जमनपेठजवळ एका जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा आणि गोळीबाराचा अवलंब करावा लागला. सर्व राजकीय पक्षांनी बिगर आदिवासींची बाजू घेऊन हैदराबाद येथे सरकारी अधिकाऱ्यांकडे निवेदने सादर केली.

खम्माम जिल्ह्याच्या आठ तालुक्यांपैकी साडेपाच तालुके अनुसूचित जमातींचे म्हणून जाहीर करण्यात आलेले आहेत. जमीन हस्तांतर नियमांप्रमाणे जुनी व नवी प्रकरणे कशी निकालात काढावयाची यासंबंधी स्पष्ट व मार्गदर्शक तत्वे कलेक्टरांनी घालून दिली आहेत; पण प्रत्यक्षात या नियमांची अंमलबजावणी कशी चालू आहे याचा आढावा घेतला तर काय आढळून येते? या कामासाठी नेमलेल्या स्पेशल डेप्युटी कलेक्टरांनी मार्च १९७९ अखेर ७००० हस्तांतर प्रकरण निकालात काढली होती व त्यापैकी ३८०० प्रकरणांमध्ये आदिवासींच्या बाजूने निर्णय दिला होता. पण जमिनी आदिवासींकडे हस्तांतरित झाल्याची कागदोपत्री नोंद केलेली असली तरी यापैकी बऱ्याचशा जमिनी प्रत्यक्षात बिगर आदिवासींच्याच ताब्यात आहेत असे आढळून आले. जमिनी सोडण्याचा हुकूम स्पेशल डेप्युटी कलेक्टरांनी दिल्यानंतरही जे बिगर आदिवासी जमिनी सोडणार नाहीत त्यांच्याविरुद्ध आंध्रप्रदेश जमीन हस्तांतर नियम १९७८ दुरुस्ती अनुसार कारवाई करावी असे आदेश तहसीलदारांना देण्यात आले आहेत, कायद्यानुसार अशा गुन्ह्यास एक वर्षापर्यंत सक्तमजुरी किंवा दोनहजार रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा देण्याची तरतूद आहे.

या प्रश्नावर राजकीय पक्षाचे नेते बिगर आदिवासींचीच बाजू कशी घेत आहेत हे पाहण्यासारखे आहे. तेलंगण नियोजन व विकास समितीचे अध्यक्ष के. अनंत रेड्डी इंदिरा काँग्रेसचे नेते आहेत. ते म्हणाले, 'जे लोक ७० ते १०० वर्षे या जमिनींमध्ये स्थायिक झालेले आहेत त्यांना तेथून हलविणे कितपत समर्थनीय आहे? तुम्ही या भागात येऊन रहा आणि आदिवासींना शेतीच्या सुधारलेल्या पद्धती शिकवा असे यापैकी काहींना सरकारनेच सांगितले होते. समाजातील एका दुर्बल घटकाचे रक्षण करताना सरकारने दुसऱ्या एखाद्या गटास दुर्बल करावे का? जमिनीवरून हुसकावले तर हे लोक एका रात्रींत भिकारी होतील. त्यांच्याबाबत सरकारची काही जबाबदारी नाही का?'

१९१७ आणि १९४९ पासूनचे नियम अंमलात आणण्यास सरकारने आज जागे व्हावे हे कितपत उचित आहे, असा प्रश्न कम्युनिस्ट पक्षाचे नेते विचारीत आहेत. दीर्घ काल चालू राहिलेला अन्याय तसाच चालू रहावा हेच त्यातून त्यांना सूचित करावयाचे आहे काय?

पाच एकरपर्यंत बागायती जमीन किंवा दहा एकरपर्यंत कोरडवाहू जमीन असलेल्या बिगर आदिवासी शेतकऱ्यांना जमिनीवरून हुसकावून लावू नये आणि १९७५ ची परिस्थिती लक्षात घेऊन हस्तांतर कायद्याची किंवा नियमांची अंमलबजावणी हवी अशी सूचना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.

जमीन हस्तांतर कायद्याच्या या अंमलबजावणीबद्दल आदिवासी आणि बिगर आदिवासी गावकऱ्यांना काय वाटते? बुरगुम पहाडमधील अश्वपुरम खेड्यास या वार्ता-

हराने भेट दिली तेव्हा असे दिसून आले की, आदिवासी जमिनीचे मालक झाले आहेत ते फक्त कागदोपत्री. प्रत्यक्षात त्यांना जमिनीची मालकी मिळालेली नाही. आदिवासी वस्तीच्या ८८ खेड्यांपैकी ५२ खेड्यांत १२८८ प्रकरणांत बिगर आदिवासींनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या असल्याचे आढळून आले; पण मूळ आदिवासी मालकांना जमिनी मिळाव्यात यासाठी सर्व कायदेशीर कारवाई फक्त तीन–चार खेड्यांतच पूर्ण झाली असल्याचे दिसून आले.


अश्वपुरम खेड्यात बिगर आदिवासीं-कडची १३५ एकर जमीन काढून घेऊन आदिवासींना देण्यात आली आहे; पण काही थोडे आदिवासी वगळता बाकी कोणी तेथे शेती सुरू केलेली नाही. ग्रामपंचायतीचे उपाध्यक्ष कुरासामपोट्टी आदिवासी आहेत. ते म्हणाले, 'तीन वर्षांपूर्वी एक एकर जमीन मला मिळाली; पण तेथे मी प्रवेश करू शकलो नाही. माझे पूर्वीचे कर्ज चुकते करण्यासाठी ही जमीन मी एका बिगर आदिवासी शेतकऱ्यास २००० रुपयांना विकली होती. जमीन हस्तांतर कायद्यानुसार ही जमीन मला परत मिळाली आहे. 'तू या जमिनीत प्रवेश केलास तर तू तरी जिवंत राहशील किंवा मी तरी जिवंत राहीन!' अशी धमकी त्या बिगर आदिवासी शेतकऱ्याने मला दिली आहे.

कृष्णा जिल्ह्यातील एक बिगर आदिवासी शेतकरी वाय्. नागेश्वरराव १९२२ पासून या खेड्यात रहात आहेत. त्यांनी सांगितले की, 'आम्ही प्रतिकूल हवा, वन्य श्वापदे यांना धैर्याने तोंड देत अनेक शतके या जमिनीचा विकास केला. ती आम्ही सोडणार नाही. शाळा, आयुर्वेदिक हॉस्पिटल, गुरांचा दवाखाना यासाठी निधी आम्ही जमा केला. गावाची उभारणी केली आणि हे सारे आम्ही आता सोडून द्यावे अशी तुम्ही कशी अपेक्षा करता? आम्हाला गावातून हुसकावले तर त्याविरुद्ध लढण्याचा निर्धार आम्ही केला आहे!'

असा आहे हा आदिवासींच्या जमिनींचा प्रश्न. सुरुवातीपासूनच निर्धाराने पावले टाकली असती तर आज ही परिस्थिती निर्माण झाली नसती; पण हा प्रश्न जमिनीतील हितसंबंधांशी निगडित झालेला असून या हितसंबंधांना दुखविण्याची काँग्रेस राज्यकर्त्यांची तयारी नव्हती आणि जनता राज्यकर्त्यांचीही नाही असा आतापर्यंतचा अनुभव आहे. आंध्रप्रदेशच्या या अनुभवावरून इंदिरा काँग्रेसचा आदिवासींचा कैवाराही कसा तोंडदेखला आहे हे स्पष्ट होत आहे. □


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते?**

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे**

अमेरिकेला इराणमधून जावे लागले. आता पाळी रशियाची. रशियन साम्राज्यवादाविरुद्ध अफगाणिस्थानमध्ये प्रचंड असंतोष धुमसतो आहे. अफगाण जनता एका वर्षाभराच्या अवधीतच का एवढी खवळली ? अफगाणिस्थानची ऐतिहासिक–सांस्कृतिक पार्श्वभूमी यासाठी पाहावी लागते. लेखिकेने तसा प्रयत्न या वार्तापत्रातून केला आहे. यात काही व्यक्तिचित्रे असतील, काही इतिहास येईल. म्हणून रूढ वार्तापत्रांपेक्षा हा एक वेगळाच 'नमुना' वाचकांसमोर येत आहे. मराठीत तरी या विषयावर असे रोचक व ताजे लिखाण यापूर्वी आलेले नाही.

## लेखांक पहिला

# काबुल-कंदहारकडचे वारे : नवे आणि जुने

प्रतिभा रानडे

## एक : फ्लॅग डे-रोज-ए-बैराग

२७ एप्रिल १९७८ रोजी अफगाणिस्थानात राज्यक्रांती झाली आणि सहा महिन्यांनी, म्हणजे १९ ऑक्टोबरला नव्या सरकारने आपला 'फ्लॅग डे–रोज–ए–बैराग' साजरा केला. खूप धूमधडाक्याने, गाजावाजा करून साजरा केला. त्या दिवशी अफगाणिस्थानचा नवा झेंडा अस्तित्वात आला. क्रांतिकारी सरकारचे म्हणणे असे की, पूर्वीचा झेंडा होता तो साम्राज्यशाहीचे, राजेशाहीचे प्रतीक होता. म्हणून तो झेंडा नको आम्हाला. आता क्रांती करून आम्ही लोकांचे राज्य आणले आहे. म्हणून आमचा आम्हाला नवा झेंडा असायला हवा. क्रांतीचा रंग लाल म्हणून झेंड्याचा रंग लाल, समृद्धीचे प्रतीक म्हणून धान्याच्या कणसाचा गोल आणि त्यामध्ये 'खल्क' असं फारसीमध्ये लिहिलेलं. खल्क याचा अर्थ जनता. इथल्या एकुलत्या एका राजकीय पार्टीचे, सत्ताधारी पार्टीचे नावही खल्कच आहे.

अशा या नव्या झेंड्याचे मोठ्या इतमामाने उद्घाटन झाले. प्रचंड मोठी, म्हणजे आठ तास सतत चालू असलेली मिरवणूक शहरातून निघाली होती. या मिरवणुकीत अफगाणिस्थानातल्या वेगवेगळ्या प्रांतातल्या २७ टोळीवाल्यांचे गट होते. काबूल शहरामधल्या प्रत्येक ऑफिसमधले सगळे लोक, शाळा-कॉलेजातले विद्यार्थी, शिक्षक, नर्सेस, डॉक्टर्स, होमगार्डस, त्यांच्या परंपरागत आदिवासी वेषामधली कित्येक नृत्यपथकं, मिलिटरी, एअरफोर्सची पथकं... लाखो लोकांनी या मिरवणुकीत भाग घेतला होता. संपूर्ण शहर या नवीन लाल झेंड्यांनी बेहद शृंगारलं होतं. प्रेसिडेंट नूरमहंमद तराकी यांनी आपल्या खल्क पॅलेस–पूर्वीचा अर्ग पॅलेस–मध्येच मानवंदना घेतली होती. तराकी किंवा अमीन, कोणी बाहेर आलेच नाहीत. खल्क पॅलेसभोवती मिलिटरीचा सख्त पहारा होता; टॅन्कस् होते, अँन्टी-एअरक्रॅफ्ट गन्ससुद्धा होत्या. कुणाला वाटावं कोणत्याही क्षणी इथं युद्ध सुरू होणार आहे.

२५–३० सन्माननीय निमंत्रित अम्बॅसॅडर्स खल्क पॅलेसच्या दोन्ही बाजूंच्या फूटपाथवर उभे होते ! त्यांना बसायला खुर्च्या नव्हत्या. सकाळी सात–सव्वासात वाजल्यापासून दुपारी साडेतीनपर्यंत तिथं टळटळीत उन्हात उभ्या असलेल्या त्या सगळ्या 'His excellencies' ना चहापाणीही काही मिळालं नाही. मध्येच एकदा साडेअकरा वाजता कोणी तरी येऊन पाण्याच्या ग्लासेसचा ट्रे फिरवून गेलं होत. एकएक करता करता शेवटी सगळे अम्बॅसॅडर्स फूटपाथवरतीच रुमाल टाकून चक्क मांडी घालून बसून गेले ! गर्दी एवढी प्रचंड होती की, त्यांच्या गाड्या तिथपर्यंत जाणं अशक्य होतं. सिक्युरिटी अरेंजमेंट-मुळे अफगाण सैनिक त्यांना चालत निघून जाऊ देत नव्हते. अफगाण सरकारची ही गैरव्यवस्था म्हणायची की, sense of humour ? काहीही असू शकतं!

ज्या दिवशी 'कूप' झाला होता तेव्हा मशिनगन्सचे आवाज




काबूलभर दणादण घुमत होते. रस्त्यावरून मिलिटरी टॅन्क्स विशिष्ट बिल्डिंग्जवर फायरिंग करतच गस्त घालत होते. त्या वेळी श्री. गुहा म्हणून एक बंगाली इंजिनिअर जीपमध्ये बसून घाईघाईनं आपल्या घरी निघाले होते. हातघाईच्या लढाईचा भाग जरासा मागे पडला तेव्हा त्यांच्या एकदम लक्षात आलं की, कशी कुणास ठाऊक, पण त्यांची जीप रस्त्यावरून जाणाऱ्या दोन टॅन्क्सच्या मध्ये सापडली होती ! श्री. गुहा चांगलेच घाबरून गेले. तेवढ्यात रस्त्यावरच्या क्रॉसिंगवरचा लाल दिवा लागला आणि काय आश्चर्य, गुहांच्या जीपसमोरचा, मिलिटरी कूमध्ये फायरिंग करणारा, तो महाप्रचंड टॅन्क थांबला ! गुहांनी कालीमातेचं स्मरण केलं; पण तेवढ्यात लाल दिव्याचा हिरवा दिवा झाला आणि पुन्हा एकदा तो टॅन्क चालू लागला. आता या गोष्टीला तुम्ही मूर्खपणा म्हणणार, Trafic discipline म्हणणार की, Sense of humour म्हणणार ? पण ही गोष्ट प्रत्यक्ष घडली हे मात्र शंभर टक्के खरं आहे.

पलॅग डे च्या दिवशी माझी मुलगी मुंबईहून दिल्ली, दिल्लीहून काबूल अशी यायची होती. दुपारी चार वाजता येणारी तिची flight late होता होता साडेसात वाजता आली. सकाळची trafic Restrictions आता जाऊन रस्ते मोकळे झाले होते. टॅक्सीतून येताना रस्त्यावर दुतर्फा लालभडक झेंडे निऑनसाइन्समध्ये झगमगत होते. सकाळी पाहिलेला 'तराकी झिंदाबाद,' 'हूरा...हूरा...' च्या आरोळ्या देणारा तो प्रचंड मानवी समुद्र अजून डोक्यात ठणठणत होता, उन्हात चार तास हिंडून जीव थकला होता. लेकही late होत गेलेल्या flights मुळे जाम वैतागली होती. एक वर्षाने भेटूनही आमचं बोलणं थंडच होतं ! माझ्या नवऱ्याला मात्र फार वेळ गप्प बसवत नाही. मुकुंदाने मग टॅक्सीवाल्याशीच बोलणं सुरू केलं—

'तू गेला होतास की नाही आज सकाळच्या परेडमध्ये ?' एक अतिशय सरळ साधा सोपा प्रश्न.

पण तो टॅक्सीवाला एकदम चिडून म्हणाला, 'मी कशाला जाऊ त्या परेडमध्ये ? सगळे धरून आणलेले लोक होते तिथं. सत्ताधारी बदलले म्हणून कुणी आपल्या देशाचा झेंडा बदलतं की काय ? तुमच्याकडे अगोदर इंद्रा गांधी होती. मग कोणी मुसलमान सत्तेवर आला. ( हा उल्लेख फकरुद्दीन अली महंमद यांचा होता ! ) त्यानंतर आता मोरारजीभाई सत्तेवर आला. तरीपण त्यांच्यापैकी कोणीही तुमचा राष्ट्रध्वज बदलला नाही. कोणी असा राष्ट्रध्वज बदलतं की काय ? पण आम्ही मात्र आमचा झेंडा बदलला. कारण काय माहीत आहे का ? या रशियन लोकांनी सांगितलं असणार, त्याशिवाय का हा लालभडक रंग एका मुसलमान देशाच्या झेंड्यावर आला ? तरी बरं, त्यांचा तो विळा-कोयता आमच्या डोक्यावर मारला नाही त्यांनी ! पण हे आम्ही चालू देणार नाही. बघा तुम्ही, एक वर्षाच्या आत या सरकारचा तख्ता आम्ही पालटून दाखवू की नाही ते. एकही रशियन माणूस आम्ही अफगाणिस्थानात जिवंत ठेवणार नाही.' तो टॅक्सीवाला धो धो बोलत होता.

जुन्या झेंड्याचे तीन रंग होते. लाल, काळ्या रंगाच्या बारीक पट्ट्या, बाकीचा रंग हिरवा, तर गरुडाचे मानचिन्ह. अफगाण लोक

स्वतःला मूळ आर्यांचे direct वंशज समजतात म्हणून गरुडाचे मानचिन्ह. अफगाण लोकांना स्वतःच्या आर्यवंशी असण्याचा एवढा अभिमान आहे की, त्यांच्या एअरलाइन्सचे नाव 'आर्याना एअरलाइन्स' आहे. एवढंच नव्हे तर एकदा दाऊदखान (यापूर्वीचा सत्ताधीश) 'अफगाणिस्तान' हे नाव बदलून 'आर्याना' ठेवण्याचा विचार करत होता. दाऊदखान स्वतःही क्रांती करूनच सत्ताधीश झाला होता म्हणून लाल रंगाचा पट्टा आणि जुन्या सरंजामशाहीचं प्रतीक म्हणून काळ्या रंगाचा पट्टा झेंड्यावर होता. हिरवा रंग हा शांतीचं प्रतीक म्हणून मानला गेला होता. प्रत्येक मुसलमानाला हिरवा रंग प्यारा. इस्लामचा उदय जिथं झाला त्या सौदी अरेबियामध्ये मैलोगणती वाळवंट पसरलेलं. पाण्याविना जीव कासावीस झालेला; वर टळटळीत ऊन, पायाखाली निखाऱ्यांसारखी भाजणारी वाळू, अशा वेळी कुठं तरी हिरवा रंग दिसला की, जीव सुखवायचा. कारण हिरवा रंग म्हणजे झाडी, गवत, फळं, पाणी, सावली, थंडावा.. यासाठीच हिरव्या रंगाचं केवढं अप्रूप असतं प्रत्येक मुसलमानाला! त्याउलट लाल रंग! उन्हात लाल रंग डोळ्यात कसा भाला खुपसल्यासारखा डोळ्यात घुसतो. म्हणून नकोच तो रंग. इथले लोक रोजच्या वापरात, ड्रॉइंग पेपरवर, लाल रंग शक्यतोवर टाळतातच. शिवाय परमेश्वराचं अस्तित्वच न मानणाऱ्या कम्युनिस्टांचा हा रंग. त्यामुळे लाल रंगाचा भरपूर द्वेष! अशा या लाल रंगाचाच झेंडा तराकीच्या सरकारने अफगाणिस्थानावर रोवला म्हणून त्या टॅक्सीवाल्यासारखे आणखी किती लोक संतापले असतील!

२७ एप्रिल १९७९ या दिवशी अफगाणक्रांतीचा वाढदिवस केवढ्या तरी धूमधडाक्याने साजरा केला – सरकारने. जशनची तयारी महिनाभर अगोदरपासून सुरू होती. जशनच्या दिवशी तर सगळ्या काबूल शहराला लाल रंग दिल्यासारखा दिसत होता. प्रत्येक दुकान, घराच्या दर्शनी भागावर, 'जगातल्या कामगारांनो, एक व्हा!' 'सौर क्रांती झिंदाबाद!' (२७ एप्रिलची क्रांती), 'तराकी झिंदाबाद'च्या लालभडक कापडावरच्या छोट्या पताका झळकत होत्या. दुकानांच्या पाट्या लाल, घराच्या दुकानांच्या दारं–खिडक्या लाल; रस्त्यावर हरतऱ्हेच्या झिंदाबादच्या प्रचंड मोठ्या पताका, चौकाचौकांतून हजारो लाल दिव्यांच्या माळा लटकत होत्या. रस्त्याकडेचे विजेचे खांब, फूटपाथवरची रेलिंग्ज लाल झाली होती, एवढंच काय म्युनिसिपालिटीची चार-पाच मजली मोठी बिल्डिंग संपूर्णपणानं लाल रंगानं रंगवली गेली होती! त्या दिवशी सकाळी, ३॥ तासांची, आपल्याकडे २६ जानेवारीला दिल्लीला परेड निघते तशी परेडही निघाली होती. रशियन मिलिटरी टॅन्क्स, बॉम्बर्स, अॅन्टी एअरक्राफ्ट गन्स, मशीनगन्स, मिसाइल्स वगैरे मिलिटरी सामर्थ्याचं दमदार प्रदर्शन झालं. शाळकरी मुला–मुलींनीही परेडमध्ये भाग घेतला होता. बॉम्बर हेलिकॉप्टर्समधून 'सौरक्रांती झिंदाबाद' 'तराकी–झिंदाबाद'च्या लाल रंगाचे छोटे छोटे कागद हजारो लोकांवर टाकले गेले. शेवटी शांतीचं प्रतीक म्हणून पांढरीशुभ्र कबुतरंसुद्धा उडवली गेली! त्या दिवशी नूरमहंमद तराकी आणि अमीन हे प्रथमच लोकांमध्ये, उघड्यावर आले होते, अगदी आपल्या कुटुंबियांसमवेत.

'जशन'चा एवढा गाजावाजा झाला आणि दीड-दोन महिन्यातच, म्हणजे २२ जूनला खुद्द काबूलमध्येच, 'जादेमवांड' या जुन्या शहरातल्या अतिशय गजबजलेल्या बाजारभागातच बंडखोरांनी उठावाचा प्रयत्न केला! आतापर्यंत काबूलबाहेर लढाया होत होत्या; पण आता मात्र खुद्द काबूलमध्येच सुरुवात झाली होती. अर्थातच सरकारने धडाधड मशिनगन्स फायरिंग, बॉम्बिंग करून ४-५ तासातच सगळ्या बंडखोरांना पकडलं तरी किंवा मारलं तरी. त्या निमित्तानं आणखी हजार दीड-हजार लोकांना पकडलं. अजूनही एखादे वेळी – बॉम्बिंगचे, फायरिंगचं आवाज ऐकू येतात. मग दुसऱ्या दिवशी कळतं की, एअरोड्रोमपलीकडच्या डोंगरावर मारामाऱ्या झाल्या, पुल-एचरखी (इथं खूप मोठा तुरुंग आहे. सहा हजार कैदी मावतील एवढ्या या तुरुंगात सध्या २०-२५ हजार राजकीय बंदी आहेत म्हणे!) भागात फायरिंग झालं. म्हणजे आता बंडखोर काबूल शहरामध्ये येऊन पोचले आहेत. म्हणूनच सरकारने जुन्या सरदारांच्या मोठमोठ्या वाड्यांमध्ये छोटे–मोठे मिलिटरी बेस आता तयार ठेवले आहेत. रात्री अकरा वाजता कर्फ्यू सुरू झाली की गावातली गस्तही वाढते. दिवसा आकाशात हेलिकॉप्टर्स सतत फिरत असतात. इस्लामिक ब्रदरहूडच्या इख्वान पार्टीचे बंडखोर आणि मार्क्सिस्ट सरकार आता राजधानीमध्येच समोरासमोर आले आहे.

अफगाणिस्थानसारख्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवनाचा विचार केला की, इथं कम्युनिस्टांचं राज्य कसं आलं हा एक अभ्यासाचा विषय ठरतो. इथले मूठभर 'रईस' लोक सोडले तर संपूर्ण देश अतिशय दरिद्री आहे. खरं म्हणजे जिथं एवढं दारिद्र्य आहे, तिथं तर कम्युनिझमचं आकर्षण वाटायला हवं; पण ते Romantic आकर्षण इथल्या सर्वसामान्य माणसाला वाटत नाही. मुख्य कारण म्हणजे इस्लामचा विलक्षण पगडा लोकांवर आहे. त्यामुळे त्यांना इतर कोणत्याही विचाराची जरूर वाटत नाही. इस्लाममध्ये कसल्याही तऱ्हेचे Compromise नाही. एक अल्लावर विश्वास ठेवणारा किंवा काफर असे समस्त मनुष्यप्राण्याचे फक्त दोनच भाग इस्लामने पाडले आहेत. त्यातल्यात्यात मग ख्रिश्चन, हिंदू, ज्यू बरा. कारण त्याचा निदान त्याच्या त्याच्या देवाधर्मावर तरी विश्वास असतो; पण देवधर्मच नाही असं म्हणणाऱ्या कम्युनिस्टांची भयंकर चीड आणि तेवढीच कसली तरी अनामिक भीती यांना वाटते. जादूटोणा, भुताखेतावर अजूनही अतोनात विश्वास असणाऱ्या सामान्य अफगाण माणसाला कम्युनिस्ट हा सैतानाचाच माणूस वाटतो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वसामान्य अफगाण माणूस दरिद्री आहे; पण तो उपाशी मरत नाही. आधुनिक भाषेत सांगायचं तर Class exploitation इथं नाही. उद्योगधंदे अतिशय कमी असल्यामुळं, श्रमिक वर्ग राजकीय दावती म्हणून उभाच राहू शकत नाही. अफगाणिस्थानातली १०–१२ मोठी शहरं सोडून दिली तर सगळा कारभार 'खानखेल' विस्तृत एकत्र कुटुंबपद्धतीवरच चालतो. बराचसा आपल्याकडच्या ग्रामपंचायतीसारखा. जुन्या टोळीवाल्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्था अजूनही चालू आहे. प्रत्येक टोळीचा प्रमुख–खान हा त्याच्या टोळीच्या योगक्षेमासाठी संपूर्णपणानं जबाबदार असतो. त्याच्या मालकीचा बराच मोठा जमीनजुमला, मेंढरांचे कळप, फळांच्या बागा असतात. त्याचप्रमाणे

टोळीतल्या इतरांकडेही लहान–मोठ्या प्रमाणात इस्टेटी असतात. ते खानाच्या किंवा इतर श्रीमंत जमीनदारांच्या शेतीवर मजुरी करतात. त्यांच्या चरितार्थाची संपूर्ण जबाबदारी खानावर असते. जातिव्यवस्था किंवा तत्सम वर्णव्यवस्था नसल्यामुळे कुणालाही स्वतःच्या कर्तृत्वावर श्रीमंत व्हायची, पराक्रमावर टोळीचे खान व्हायचीसुद्धा शक्यता असते; कारण खान हा वेळोवेळी निवडणुका होऊनच निवडला जातो. इथलं तत्त्व म्हणजे, 'तूही नान खा, मी पण नान खातो, मी फार तर मटणाबरोबर नान खाईन!' त्यामुळे इथे उपाशी कोणी मरत नाही आणि इस्लामवरची आंधळी श्रद्धा, उपाशी पोटाची कळ मस्तकात जाऊ देत नाही. म्हणून त्यांना कम्युनिझमचं आकर्षण वाटत नाही. प्रत्येक मुसलमानानं स्वत.ला कुराणाच्या संपूर्णपणानं आधीन करून टाकलेलं असतं. कुराणानं, इस्लामनं आखून दिलेल्या चौकटीबाहेर तो जाऊ शकत नाही, त्याबद्दल कसले प्रश्नही तो विचारू शकत नाही.

पण कम्युनिझमचं आकर्षण इथल्या मध्यमवर्गाला, म्हणजे शिक्षक, प्रोफेसर्स, डॉक्टर, लहान दुकानदार, नोकरदार, इंजिनिअर, आर्किटेक्टस् वगैरे इतर धंदेवाइकांना वाटलं. एक तर या मध्यमवर्गाला माहीत असतं की कोणताही 'इझम' आला तरी आपल्या परिस्थितीत फारसा फरक पडत नाही. त्यामुळं वेगवेगळे राजकीय बदल करून आणण्याची त्या वर्गाला सवड असते, बौद्धिक पात्रता असते, स्वस्थताही असते. इस्लाममध्ये ज्या प्रश्नांना उत्तरं नाहीत त्या प्रश्नांची उत्तरं या वर्गानं मार्क्सिझममध्ये शोधण्याचा प्रयत्न चालवला. भारतातले सहा रुपये एवढाच पगार मिळणाऱ्या आर्मीतल्या शिपायांना, दाऊदखाननं दुखवून ठेवलेल्या आर्मी जनरलसना आणि बुद्धिवादी मध्ययवर्गीयांशी नातं असलेल्या, आर्मीमधल्या मध्यम श्रेणीच्या ऑफिसर्सना मार्क्सिझम आकर्षक वाटला, नव्या मनूचा उद्गाता वाटला.

अफगाणिस्थानातल्या कम्युनिस्ट पार्टीची–खल्क पार्टीची–स्थापना पंधरा वर्षांपूर्वीच, तराक्की, अमीन वगैरे लोकांनी मिळून केली होती. कधी उघडपणानं पण बहुतकरून गुपचूपपणानंच पक्षबांधणीचे त्यांचे काम चालू होते. त्यांना मिळालेले अनुयायी जास्त करून काबूल शहरापुरतेच मर्यादित होते. इतर ठिकाणी फक्त मोठ्या शहरांतूनच थोडेसेच कार्यकर्ते होते. पक्षाचे राजकीय सामर्थ्य काबूलमध्येच जाणवण्यांएवढे होते. २७ एप्रिलची क्रांती यशस्वी झाली ती मुख्यत: आर्मीमधल्या कम्युनिस्ट गटामुळेच. ही क्रांती लोकांची नव्हती. ती होती लष्कराची आणि पक्षकार्यकर्त्यांची.

तरीमुद्धा सुरुवातीला पठाणटोळीवाले (तेसुद्धा त्यांची सत्ता गेली म्हणून) सोडले तर इतरांचा नव्या सरकारला एवढा विरोध नव्हताच. राजघराण्याची सत्ता जाऊन सामान्य माणूस सत्तेवर आला होता, म्हणजे 'खानखेल'च्या परंपरेत बसणारीच घटना होती ती. नवीन सरकार काय करते याची उत्सुकता होती. काही अपेक्षाही होत्या. त्यासाठी लोक वाट पहायला तयार होते. जमीनदारांच्या जमिनी काढून भूमिहीनांना जमिनी वाटण्यात आल्यावर लोक केवढे खुश झाले होते! पण मुल्ला मौलवींनी हळूच प्रचार सुरू केला की, नुकसानभरपाई न देता, बळजबरीनं जमीन काढून घेणं हे पाप आहे. शिवाय मनात संशय आला की आज श्रीमंतांकडून जमिनी काढून आम्हाला दिल्या आहेत, उद्या आमच्याकडून काढून घेऊन रशियाप्रमाणे सरकारजमाच करणार नाहीत कशावरून? तेव्हा नकोतच त्या जमिनी! जमिनी घ्यायला येणाऱ्यांची संख्या रोडावली. काहींनी तर जमिनी परत दिल्या! हुंडाबंदीचा कायदा, सक्तीचे स्त्रीशिक्षण लोकांना मुळीच आवडले नाही.

आणि मुख्य म्हणजे नवीन सरकारने इस्लाम विरुद्ध कारवाया सुरू केल्या, त्या लोकांना मुळीच आवडल्या नाहीत. नवीन सरकारने मुल्ला-मौलवींना तुरुगात टाकले, इस्लामी कायदेकानूंच्याऐवजी आधुनिक कायदेकानून लागू केले. रेडिओ, टिव्हीवरचं कुराणाचं पठण बंद केलं. यामुळं सर्वसाधारण माणूस संतापला. अफगाणिस्तान हे पहिलेच मुसलमान राष्ट्र असेल की ज्यानं उघडउघड इस्लाम झुगारून देऊन, धर्मातीत कारभार सुरू केला. मुळातच इस्लाममध्ये कसल्याही प्रकारचा संवाद नाहीच आणि त्यात भर म्हणजे इथे साक्षरता अत्यंत कमी आहे. फक्त २ टक्के बायका साक्षर आहेत; तर १० टक्के पुरुष साक्षर आहेत. अशिक्षित आणि आधुनिक जगाचे संदर्भच ज्याला नको आहेत अशा माणसावर धर्माचाच फक्त पगडा असतो, धर्मासाठी तो काहीही करायला तयार होतो. आजच्या अफगाणिस्तानातला माणूस कम्युनिस्ट सरकारविरुद्ध काहीही करायला त्यामुळेच तयार झाला आहे. आता तर पूर्वी मार्क्सिस्ट असलेला आर्मीतला शिपाईच काय, पण ऑफिसरसुद्धा आर्मी सोडून बंडखोरांना सामील होतो आहे.

अफगाणिस्तानात मोहम्मद विरुद्ध मार्क्स असा हा झगडा आहे असं साधारणपणे म्हटलं जातं; (विशेषतः पाश्चात्य वृत्तपत्रांतून) पण तेही तितकसं बरोबर नाही. इथले मुसलमान म्हणतात, इस्लाममध्ये मार्क्सिझमची सगळी तत्त्वं आहेतच. आम्हाला हा नवीन, परधार्जिणा मार्क्सिझम नको आहे, आणि मुख्य म्हणजे रशियाकडून किंवा इतर कुठल्याच राष्ट्राकडून आम्हला मार्क्सिझम शिकायचा नाही.

अफगाणिस्तानच्या लोकांना आधुनिक टेक्नॉलॉजी हवी आहे; पण ती टेक्नॉलॉजी तयार करण्यामागची मूल्ये नको आहेत. त्यामागचा कोणता 'ईझम' तर मुळीच नको आहे. त्यांना रशियन लष्करी साहित्य हवे आहे; पण मार्क्सिझम नको आहे. पाश्चात्य देशातले ट्रॅक्टर्स, ट्रक्स हवे आहेत; पण पाश्चात्य जीवनमूल्ये नको आहेत. प्रगत राष्ट्रातील विचारसरणी, रहाणी, जीवनमूल्ये यामुळं आमच्या परमपवित्र, श्रेष्ठ इस्लामी संस्कृतीचा ऱ्हास होईल अशी त्यांना भीती वाटते.

अफगाणिस्तानातल्या या सगळ्या राजकारणात रशिया फार गुंतला आहे. गेल्या शंभर-दीडशे वर्षांपासून हिंदी महासागरात प्रवेश मिळावा म्हणून अफगाणिस्तान आपल्या अंकित करण्याच्या रशियन कारवाया सुरू आहेत. म्हणूनच अफगाण माणूस रशियावर अतिशय चिडून आहे. आज तर अशी परिस्थिती आहे की, काबूल शहर सोडून (कारण तिथे रशियन्सना भरपूर सरक्षण असते) जिथे कुठे रशियन माणूस, बायका–मुलं, आर्मीचे लोक, जो कोणा रशियन सापडेल त्याला अत्यंत हालहाल करून मारतात! त्याबाबतीत अफगाण माणसाच्या क्रौर्याला सुमार नाही! यावर उपाय म्हणून रशियाने गोरे रशियन्स देशाच्या अंतर्भागातून काढून घ्यायला

सुरुवात केली आहे; पण जिथे बंडखोरांचा सर्वांत जास्त जोर आहे त्या पाकिस्तानसरहद्दीवरच्या भागात उजबेकिस्तानातली रशियन लष्कर पाठवायला सुरुवात केली आहे. हे लोक आता रशियन असले तरी ते वांशिकदृष्टचा अफगाणच आहेत. त्यांची भाषा फारसी. रशियात विलीन होण्यापूर्वी त्यांचा धर्मही मुसलमानच होता. ते दिसतात, वागतात अफगाणि लोकांसारखेच. अफगाण कपडे घालून ते अफगाण सैन्यात बेमालूम मिसळून जातात आणि बंडखोरांशी लढतात अशी अगदी ताजी खबर आहे. आतापर्यंत रशियाने ज्या ज्या देशांना मदत केली ती वाटेल तेवढी लष्करी सामग्री देण्यापुरती होती. रशियन सैनिक दुसऱ्या देशात जाऊन कधी लढले नव्हते. याला अपवाद फक्त चेकोस्लोव्हाकियाचा. १९६८ मध्ये तिथे काय झालं ते इथल्या लोकांना माहीत आहे. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक बाबतीत आधुनिक जगाबरोबर चालण्याची इच्छा नसणारा सर्वसामान्य अफगाण माणूससुद्धा, B. B. C., Voice of America, रेडिओ इराण, ऑल इंडिया रेडिओ, रेडिओ पाकिस्तानवरच्या बातम्या ऐकतो. जगातल्या घडामोडींची नोंद घेतो आणि त्यांचे संदर्भही लावतो.

म्हणूनच आमच्या ऑफिसच्या गाडीचा ड्रायव्हर म्हणत होता, 'रशियन्स ही जात फार खतरनाक. सैतानाची अवलाद! शंभर वर्षांची जरी त्यांच्याबरोबर मैत्री असली तरी ते तुम्हाला कधी दगाफटका करतील ते सांगता येणार नाही. एके काळी उजबेकिस्तान आमचं होतं. समरकंद, बोखारा ही शहरं आमची होती. ती रशियानं खालसा केली आणि आता त्यांचा सबंध अफगाणिस्तानवरच डोळा आहे; पण आम्ही त्यांना पुरून उरू! थोडे दिवस जाऊ देत. आमची तयारी चालू आहे. एक रशियन इथं शिल्लक ठेवणार नाही. पहा तुम्ही!'

## दोन : जुना इतिहास

अफगाणिस्तानातल्या प्राचीन-अर्वाचीन इतिहासाचे भग्नावशेष सबंध देशभर विखुरलेले आहेत. यापैकी सर्वांत अलीकडचा भग्नावशेष २५ जून १९७९ चा आहे. त्या दिवशी, सध्याच्या रशियाधार्जिण्या क्रांतिकारी सरकारविरुद्ध उठलेल्या बंडखोरांनी काबूलमध्येच उठाव केला होता. आतापर्यंत सरकारविरुद्ध बंडखोर अशा लढाया काबूलबाहेर संपूर्ण अफगाणिस्तानभर गेले ८-१० महिने चालूच आहेत; त्या दिवशी खुद्द राजधानीमध्ये हा उठाव झाला; पण ७-८ तासातच प्रेसिडेंट नूरमहंमद तराकीच्या सरकारने तो उठाव सध्या तरी दाबून टाकला आहे. त्या वेळी जे थोडसं बॉम्बिंग झालं त्यामध्ये ढासळलेली ३-४ मजली घरं, हॉटेलं, जादेमेवांड या जुन्या शहरातल्या अत्यंत गजबजलेल्या भागात उभी आहेत.

सर्वांत जुना भग्नावशेष उत्तर अफगाणिस्थानातल्या 'सुर्खकोटाल' या ठिकाणी सापडला आहे. 'महाप्रतापी, कनिष्कराजाच्या सुखसोयीसाठी हे पाण्याचे पाट काढण्यात आले.' अशा अर्थाचा शिलालेख तिथल्या उत्खननात सापडला आहे; पण इथला इतिहास त्याहीपूर्वी शेकडो वर्षे पोचलेला आहे. वेद इथंच लिहिले गेले असा कोणी दावा करतात. शिवाय झरथुष्ट्राने आपल्या धर्माची स्थापना इथं केली आणि 'अवेस्ता' हा धर्मग्रंथ इथंच लिहिला गेला. या दोन्ही गोष्टींना लेखी पुरावा अर्थातच नाही. वेद लिहिला गेला की नाही हा चर्चेचा विषय ठरावा; परंतु झरथुष्ट्राबद्दल मात्र इथल्या जुन्या लोककथांमधून, पोवाड्यांतून उल्लेख आहेत. उत्तर अफगाणिस्तानात अजूनही मूठभर का होईना, पण झरथुष्ट्राचे अनुयायी आपला धर्म सांभाळून आहेत.

जगज्जेता अलेक्झांडर हिंदुस्थान जिंकायला निघाला तेव्हा अफगाणिस्तानात बराच काळ राहिला होता. ठिकठिकाणी त्याने आपल्या नावाने शहरे वसवली होती. उत्तर अफगाणिस्तानातल्या बल्ख या गावी तर कित्येक दिवस त्याचा मुक्काम होता. बल्ख हे एकेकाळचं अत्यंत वैभवशाली शहर. सर्व तऱ्हेच्या कलांचा विकास पावलेलं, जगभरातले तत्त्वज्ञानी, पंडित, कलाकारांचं केंद्रस्थान झालेलं, अत्यंत श्रीमंत असं हे जगातलं पहिलं शहर, म्हणून या शहराचा गौरवाने उल्लेख होतो. परवा परवापर्यंत म्हणजे तैमूरलंगापर्यंत या शहराची शान शाबूत होती; पण तैमूरलंगानं मात्र हे सुंदर शहर अक्षरशः जमीनदोस्त केलं. आज या शहरावर दारिद्र्याचं आणि धुळीचं साम्राज्य आहे. मातीचे प्रचंड बुरूज कित्येक फर्लांग पसरलेले आहेत. या धुळीखाली आणि या बुरुजांखाली इतिहासातील किती आणि कोणती गुपितं लपलेली आहेत कुणास ठाऊक!

पण या अलेक्झांडरचा खरा वारसा सांगणारे लोक अजूनही अफगाणिस्तानातल्या नूरिस्तान या प्रांतात आहेत. नूरिस्तानी लोकांचं म्हणणं की, आम्ही खुद्द अलेक्झांडरच्या काळात इथं येऊन राहिलेल्या ग्रीकांचे वंशज आहोत. त्यांचं दिसणं, वागणं, बोलणं (भाषा) इतर अफगाण लोकांपेक्षा बरंचसं वेगळं आहे. इथले लोक अतिशय सुरेख आहेत; विशेषतः बायका तर विलक्षण सुंदर आहेत. त्यांचे कपडे युरोपिअन जिप्सी लोकांसारखे आहेत. कथलाचे आणि चांदीचे चित्रविचित्र दागिने या बायका घालतात. यांची घरं डोंगरांच्या उतरणीवर एकाखाली एक अशी असतात. घरं लाकडाची असतात आणि घराचा दर्शनी भाग, दारं, खिडक्या, घरातल्या तुळया, खांब यावर अतिशय सुरेख, नाजूक लाकडी कोरीव काम केलेलं असतं. इतकी देखणी घरं क्वचितच कुठं सापडतील. बाकीच्या जगाच्या दृष्टीआड, समूह करून, आपापल्यातच राहायची या लोकांची वृत्ती. आताआतापर्यंत म्हणजे १८९६ पर्यंत हे लोक मुसलमान नव्हते. वैदिक धर्माशी, ग्रीकधर्माशी दूरचं नातं सांगणारा, नैसर्गिक शक्तींना देव मानून त्याची पूजा करणारा असा काहीसा त्यांचा धर्म होता. १८९६ मध्ये अब्दूर रहमान या इथल्या अमीरानं त्यांना जबरदस्तीनं मुसलमान केलं. शांततेच्या काळातसुद्धा नूरिस्तान पहायला जाणाऱ्यांवर अतिशय बंधनं होती.

अलेक्झांडरनंतर हिंदुकुश पर्वतरांगांच्या दक्षिणेला अशोक, चंद्रगुप्त मौर्यांचं राज्य पसरलं होतं. कंदाहार या शहरामध्ये अशोकाचा शिलालेख सापडला आहे. त्यानंतर कनिष्कानं इथं बरीच वर्षं राज्य केलं; कुशाणांच्या कारकीर्दीत तर जवळजवळ संपूर्ण

अफगाणिस्तानात बुद्धधर्म आचरला जात होता. त्या काळी इथं लहान–मोठी राज्यं होती. काही हिंदू राजे होते, तर काही बुद्ध राजे. हिंदू आणि बुद्ध अशी प्रजा होती. अफगाणिस्तानात ठिकठिकाणी बुद्धाचे स्तूप, मठ, दुर्गेम्मा, विष्णूम्मा, गणपतीच्या मूर्ती सापडतात. बालियान या गावातल्या १७५ आणि १२० फूट उंचीच्या उभ्या बुद्धमूर्ती तर जगातल्या सर्वांत मोठ्या मूर्ती आहेत. अफगाणिस्थानात पाकिस्तानच्या सरहद्दीवर ननग्रहार या गावात–हल्लीच्या जलालाबाद इथं–केवढं तरी मोठे बुद्धमठ, स्तूप, मूर्ती, पाठशाळा–एक संपूर्ण प्रचंड मोठा बुद्धपरिसरच सापडला आहे. फाहियान, ह्यूएनत्संग या चिनी प्रवाशांनी आणि हुई चाओ या कोरिअन बुद्धभिक्षूने अफगाणिस्तानातल्या ठिकठिकाणच्या बौद्धवास्तूंचे, तिथल्या वैभवाचे, सामर्थ्यवान हिंदू आणि बुद्ध राजांचे नेत्रदीपक, रसभरित वर्णन करून ठेवले आहे.

त्यानंतर मग गोऱ्या हूणांच्या स्वाऱ्यांपाठोपाठ आलेल्या अरब; तुर्की टोळीवाल्यांपुढे अफगाणिस्तानातले पराक्रमी हिंदुराजे, बुद्धराजे कमकुवत ठरले. या अरबांनी, तुर्कांनी नुसतीच लुटालूट केली नाही तर संपत्तीच्या लोभानं इथली श्रीमंत देवस्थानं फोडली, मूर्ती फोडल्या, बुद्धमठ लुटले. त्यांनी आपल्याबरोबर इस्लाम आणला, नवीन विचार, नवीन जीवनपद्धती आणली. त्यांच्या मारामाऱ्या, लुटालुटीला धार्मिक अधिष्ठान होतं ! जी दुष्कृत्यं होत होती त्याला धर्माचा पाठिंबा होता ! हे काही तरी वेगळंच, अफलातून होतं !

तरी पण अजूनही सरसहा, बळजबरीच्या धर्मांतराला सुरुवात झाली नव्हती.

ते काम केलं गझनीच्या महंमुदानं. सोळा वेळा हिंदुस्तान लुटणाऱ्या, सोमनाथाचं देऊळ भ्रष्ट करणाऱ्या महंमुदानं ! या महंमुदाचं चरित्र वाचलं. आपला हिंदुस्तान लुटला, सोमनाथाचं देऊळ लुटलं म्हणून आपला त्याच्यावर राग असणं अत्यंत स्वाभाविकच आहे; पण हा माणूस मोठा कर्तृत्वाचा. त्याचा पराक्रम असा की, हिंदुस्थानवर त्याने स्वाऱ्या केल्याच; पण इकडे इराणवरसुद्धा स्वाऱ्या करून तिथल्या अरबी, तुर्की, ससानाईड राज्यकर्त्यांना जिंकून तिथं स्वतःचा अंमल चालू केला. काबूलपासून ३०–४० मैलांवरच गझनी हे स्वतःचं राजधानीचं शहर त्यानं उत्तमोत्तम राजवाड्यांनी, पुस्तकालयांनी, वस्तुसंग्रहालयांनी, बागांनी अप्रतिम सजवलं. 'मूर्तिभंजक' म्हणून नाव मिळवलेल्या या महंमुदानं, आपल्या राजवाड्याच्या भिंतींवर मूर्ती कोरून, आपल्या लढायांची दृश्यं उभी केली. इराण, हिंदुस्थानातून लुटून आणलेली संपत्ती यानं राजधानी गझनी आणि इतर मोठ्या शहरांवर उधळली. महंमूद स्वतः अत्यंत हुषार होता, विद्वानांची कदर करणारा होता. आपल्या दरबारी अल्-बरुनी हा शास्त्रज्ञ आणि इतिहासकार, फिरदौसी, अन्साडी हे कवी, इतिहासकार अल्-उतबी यांना त्याने अत्यंत सन्मानाने ठेवून घेतले होतं. या महंमुदाबद्दल एक अतिशय महत्त्वाची हकीगत वाचायला मिळाली. कदाचित ही दंतकथाही असेल.

सोमनाथाच्या मंदिरातल्या ज्योतिष्यांना कळलं होतं की, पश्चिमेकडून कोणी तरी येऊन सोमनाथाचं देऊळ फोडणार आहे. त्या माणसाचं वर्णनही त्यांना कळलं. तेव्हा त्यांनी काही लोकांना पश्चिमेला शोधासाठी पाठवलं. ते लोक गझनीला आले. महंमुदाशी हे वर्णन जुळत होते. तेव्हा ते लोक महंमुदाला भेटले आणि त्यांनी त्याच्यापुढे प्रस्ताव मांडला, 'आम्ही तुला अमूक रक्कम देऊं; पण तू आमच्या सोमनाथाचे मंदीर फोडू नकोस.' महमूद विचारात पडला. एवढ्या दूरच्या मुलुखातून हे लोक एक मंदिर फोडू नकोस म्हणून मला सांगायला आले आहेत, एवढं त्या मंदिराचं काय महत्त्व आहे ? त्यानं जरा ताणून धरलं. तेव्हा ते लोक म्हणाले, 'तू मागशील तेवढी रक्कम आम्ही तुला मोठ्या सन्मानानं पाठवून देऊ; पण तू आमचं मंदिर भ्रष्ट करू नकोस.'

या त्यांच्या बोलण्यावरून त्या मंदिराची किंमत केवढी प्रचंड असेल त्याची महंमुदाला कल्पना आली. तो त्या लोकांना म्हणाला, 'मूर्तीचा सौदा करणारा, लाचखाऊ राजा म्हणून मला प्रसिद्धीला यायचं नाही. प्रसिद्धीच मिळवायची असेल तर 'मूर्तिभंजक' म्हणूनच ती मी मिळवेन. जा तुम्ही. मंदिराच्या रक्षणाच्या तयारीला लागा.'

ते लोक परत गेल्यावर मग महंमुदाने हिंदुस्तानविषयी माहिती गोळा करायला सुरवात केली. हिंदुस्थानच्या श्रीमंतीचे वर्णन ऐकून त्याच्या तोंडाला पाणी सुटलं आणि मग त्यानं हिंदुस्थानवर स्वाऱ्या सुरू केल्या. त्याअगोदर त्याला सिंधू नदीपलीकडच्या देशाची अगदी अस्पष्ट कल्पना होती. अमाप संपत्ती गोळा करणारा, गझनीचं वैभवशाली राज्य स्थापन करणारा हा पराक्रमी महंमूद शेवटी माणसाला मरावंच लागतं म्हणून ढसढसा रडला. त्याच्यानंतर त्याच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. आजचं गझनी शहर म्हणजे ३०–४० हजार वस्ती असलेलं, पडक्या मातीच्या घरांचं, कुठं तरी एखादी ढासळलेली कमान, मिनार जुन्या वैभवाची लक्तरं सांभाळत उभं असलेलं केविलवाणं खेडेगाव आहे.

त्यानंतर चेंगीझखानानं आपलं 'कर्तृत्व' गाजवलं. दक्षिण अफगाणिस्तानातल्या महंमुदाच्या वैभवशाली सुंदर शहरांची त्यानं वाताहत केली. हिंदुकुश पर्वतरांगांच्या उत्तरेची, पर्वतांच्या कुशीतली बामियान आणि त्याच्या आजूबाजूची लहान लहान, सुंदर हिंदुबौद्ध राज्ये लुटली, जाळली, निर्मनुष्य करून टाकली. चेंगीझखानाच्या पाठोपाठ, त्याच्या पावलावर पाऊल ठेवून तैमूरलंगाने उरल्यासुरल्या अफगाणिस्तानावरून वरवंटा फिरवला; पण त्याचा मुलगा शहारुख आणि नातू उलुगबेग यांनी हेरत (दक्षिण अफगाणिस्तान) आणि समरकंदला (आता रशियामध्ये) मोठमोठ्या सुरेख इमारती उभ्या करून तैमूरलगाचं पाप थोडं तरी धुऊन काढायचा प्रयत्न केला.

शहारुखची बायको गोहरशाद हिनेही हेरनला आपल्या पसंतीच्या मशिदी, कबरस्तानं, शाळा बांधून घेतल्या. त्यांचे अवशेष आजही तग धरून आहेत. या गोहरशादची एक गंमतच झाली. तिने स्वतःच्या देखरेखीखाली एक विलक्षण सुंदर अशी मुलींसाठी, वसतिगृह–शाळा बांधवून घेतली. मोठ्या समारंभाने किती तरी मुली त्या शाळेत रहायला आल्या. मुसलमान धर्माप्रमाणे मुलांना त्या बाजूला फिरकायचीसुद्धा बंदी होती. असं असूनही बरीच गुपचूप प्रकरण तिथं चालू हातीच. एकदा ही गोहरशाद अचानकच आपल्या लाडक्या शाळेला भेट द्यायला आली. मग सगळ्यांची पळापळ झाली. एक मुलगा मात्र नखशिखांत बुरखा घातलेला, (त्याला पळून जायला सवडच मिळाली नाही.) एका मुलीच्या खोलीतल्या बंद कपाटात अर्धमेला झालेला सापडला. आता हा तर मोठा गजहब झाला. बाहेर कळल तर लोक काय म्हणतील ? अगोदरच गोहरशादने मुलींच्या शिक्षणासाठी एवढा खटाटोप करून, मुलींना शिकवून भलतीच बंडखोरी केली होती. त्यातच या भानगडीची भर पडली होती. आता काय करावं ? तेव्हा मग घाईघाईनं त्या मुला-मुलीचं लग्न लावून

दिलं ज्या मुलींना इच्छा होती त्यांनाही लग्न करून शिकण्याची परवानगी दिली आणि मग त्यांच्या नवऱ्यांसाठी, मुलींच्या शाळेशेजारीच आणखी एक वसतिगृह–शाळा काढली. फक्त पौर्णिमेच्या दिवशीच त्यांना आपल्या बायकांना भेटायला जाण्याची परवानगी देण्यात आली. पाचशे वर्षांपूर्वी गोहरशाद या प्रबुद्ध मुस्लिम राणीने अफगाणिस्थानात मुलींच्या शिक्षणासाठी एवढा खटाटोप केला होता. हेरतमधल्या या सुंदर आणि बुलंद इमारती ब्रिटिशांनी अमीर अब्दूर रहमानच्या सांगण्यावरून १८८५ मध्ये पाडून टाकल्या. तेव्हा रशिया त्या बाजूने हल्ला करील अशी भीती त्यांना वाटत होती. या इमारतींचा फायदा रशियन सैन्याला मिळू नये म्हणून त्या इमारतीच पाडून टाकल्या. त्यांपैकी एक उंच मिनार तेवढा शिल्लक ठेवला होता, तो आजही कसाबसा उभा आहे. इतर हेरत शहर म्हणजे अगदी अरुंद गल्ल्या, मातीच्या विटांची घरं, घाणेरडे 'चायखाने', एखाददुसरं त्यातल्यात्यात बऱ्यापैकी हॉटेल, काही आधुनिक पद्धतीची पाच–दहा घरं, नखशिखांत बुरखा घातलेल्या बायका आणि मुल्लामौलवींच्या आहारी गेलेली साठ हजार लोकसंख्या.

त्यानंतर बाबर समरकंदहून इथं आला आणि हिंदुस्थानात जाऊन त्यानं तिथंच आपलं मोगल साम्राज्य स्थापलं. अजूनही अफगाणिस्थानात एकसंध असं कुणाचंच राज्य नव्हतं. वेगवेगळ्या टोळीवाल्यांची आपापली छोटी छोटी राज्यं होती. १७४७ मध्ये अहमदशहा अब्दालीने एकएक टोळी आपल्या अंकित करून घेऊन, अफगाणिस्थानामध्ये प्रथमच एकसंध असं राष्ट्र स्थापन केलं. म्हणूनच अफगाणलोक अब्दालीला 'अहमदबाबा' म्हणतात, त्याला आपला राष्ट्रपिता मानतात. अब्दालीने हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या. पानिपतच्या युद्धात मराठ्यांविरुद्ध लढून, जय मिळूनही तो दिल्लीच्या तख्तावर न बसता अफगाणिस्थानात परत आला. कारण त्याला इथेच स्वतःचं बलिष्ठ राज्य, एकसंध राज्य स्थापायचं होतं. अब्दालीच्या मृत्यूनंतर पुन्हा केंद्रसत्ता विस्कळित झाली. प्रत्येक टोळीने पुन्हा एकदा स्वतंत्रपणाने आपला सवता सुभा मांडला. आपापसातल्या लढाया आणि सत्तास्पर्धा पुन्हा सुरू झाली.

१८८० मध्ये अब्दूर रहमान हा अमीर झाला आणि आधुनिक अफगाणिस्थानचा इतिहास सुरू झाला. अब्दूर रहमानने काही टोळीवाल्यांना पैसा देऊन त्यांचं इमान विकत घेतलं, तर काहींशी लढाई करून त्यांना आपले मांडलिक बनवलं. अब्दूर रहमान आणि त्यानंतर त्याचा मुलगा हबीबुल्ला यांना सतत उत्तरेकडून रशियाची भीती होती आणि पूर्व–दक्षिणेकडून, भारतामध्ये सर्वसत्ताधीश झालेल्या ब्रिटिशांकडूनही भीती होती. रशिया आणि इंग्रज यांनाही एकमेकांच्या हेतूंबद्दल सतत संशय होताच. अब्दूर रहमान आणि हबीबुल्ला यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि अफगाणिस्थानच्या राजकारणात त्यांनी ब्रिटिशांचा शिरकाव होऊ दिला नाही. त्यांच्याजवळ असलेला सगळा पैसा त्यांनी शस्त्रास्त्रं घेण्यात आणि आपलं सैन्य सुसज्ज ठेवण्यात खर्च केला. यांचे राजवाडे आपल्याकडच्या लहानशा संस्थानिकांच्या राजवाड्यांपेक्षा सुमार आहेत. अमानुल्लाने सैनिकी शिक्षण देण्यासाठी जर्मन लष्करी अधिकारी आणले. पटवर्धन म्हणून एक महाराष्ट्रीयनही त्यात होता. ब्रिटिशांची हिंदुस्थानातली सत्ता वाढत होती. त्या काळापासून अफगाणिस्थानने ब्रिटिशांशी तीन वेळा लढाई केली. १८४२ साली पहिल्या अँग्लो–अफगाण युद्धात ब्रिटिशांना मारून, १८७८ सालच्या दुसऱ्या युद्धात अपमानकारक अटी पत्करून, हार मानून तर १९१९ च्या तिसऱ्या युद्धात अफगाणिस्तानकडे मोठेपणा जाऊन, ब्रिटिशांशी समझौता करून, अफगाणिस्तानने आपलं स्वातंत्र्य टिकवून धरलं. ब्रिटिशांनी रशियाशी परस्पर बोलणी करून अनेक वेळा अफगाणिस्तानला अडचणीत टाकलं. ब्रिटिशांनी, रशियाने अनेक वेळा शब्द देऊनही अफगाणिस्तानला फसवलं. त्याचा कायमचा धडा अफगाण लोक शिकले आहेत. तो म्हणजे, कोणत्याही परकीयावर कधीही विश्वास ठेवायचा नाही.

१९१९ मध्ये अमानुल्ला, अब्दूर रहमानचा नातू अफगाणिस्तानचा अमीर झाला आणि त्याने प्रथमच, अजूनही १६–१७ व्या शतकातच जगणाऱ्या अफगाणिस्तानला एकदमच विसाव्या शतकात आणायचा धाडसी प्रयत्न केला. शेक्सपीअरन ट्रॅजेडीसारखी त्याची शोकांतिका झाली. भविष्याची उजळ, भव्य स्वप्नं पहाणाऱ्या या राजाचे प्रयत्न सफल झाले नाहीत. भारतावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांना अमानुल्ला धोकेबाज वाटू लागला. भारतातल्या हिंदू–मुसलमानांच्या एकीसाठी प्रयत्न करणारा अमानुल्ला जर भारतावर चालून आला तर ब्रिटिशांविरुद्ध आम्ही त्याला मदत करू, आम्ही त्याचे स्वागत करू असं म. गांधी म्हणाले होते. तेव्हा बच्चा-ई-साकाव या एका पाणक्याच्या दरवडेखोर मुलाला हाताशी धरून त्यांनी त्याच्यातर्फेच अमानुल्लाविरुद्ध लढाई सुरू केली. अमानुल्ला निघून गेला. मरेपर्यंत त्याला आशा होती की, आज नाही तर उद्या माझ्या लोकांना माझी किंमत कळेल आणि मला सन्मानानं परत बोलवलं जाईल; पण तसं काहीही घडलं नाही. त्याचाच दूरचा चुलतचुलत भाऊ जाहीरशहा याने चाळीस वर्षं अफगाणिस्तानवर राज्य केलं. अत्यंत सुशिक्षित,सुसंस्कृत अशा जाहीरशहाच्या वेळी लोकांना सगळ्या तऱ्हेचं स्वातंत्र्य होतं. आपल्या राजाची टिंगलटवाळी करण्याचं, त्याच्याविरुद्ध वृत्तपत्रं चालवण्याचंही ! पण जाहीरशहा अमानुल्लावरून धडा शिकला होता. त्याने कोणतीही सुधारणा लोकांवर लादली नाही. डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी जाहीरशहा रोमला गेला होता तेव्हा एकदा त्याच्या पुतण्याने–दाऊदखानने–हा राजाचा पंतप्रधानही होता–सगळ्या महत्त्वाच्या व्यक्तींना, लष्करातल्या महत्त्वाच्या अधिकाऱ्यांना आपल्या घरी जेवायला बोलावलं. सगळ्यांना भरपूर दारू पाजली. रात्रभर मेजवानी करून ४–४॥ वाजता जेव्हा एकएक जण डुलतडुलत बाहेर पडला तेव्हा एकेकाला धरून दाऊदखानच्या लोकांनी सरळ तुरुंगातच टाकलं. सकाळी शुद्धीवर येऊन पहातात तर ते कैदी होते. सकाळी उरल्यासुरल्या लोकांना, काहींना पकडून नेलं तर काहींच्या घरांवर पहारे बसवलं. एखाद्याने कुणी प्रतिकार केला तर तेव्हा जी काय बंदूक चालली असेल तेवढीच. सकाळी दहा–साडेदहा वाजता गावातून मिलिटरीच्या गाड्या फिरू लागल्या. कर्ण्यातून ओरडून लोकांना सांगायला की, 'अफगाणिस्तानात राज्यक्रांती झाली आहे !' पूर्वीची सरंजामशाही, जाहीरशाही संपून आता लोकशाही आली आहे–लोकांचं राज्य सुरू झालं आहे. अशी ही पहिली राज्यक्रांती झाल्यानंतर चार वर्षांनी, गेल्या वर्षी २७ एप्रिल १९७८ रोजी दुसरी रक्तरंजित राज्यक्रांती झाली आणि आता 'डेमोक्रॅटिक रिपब्लिक अफगाणिस्थान'चे राज्यशकट अध्यक्ष नूरमहंमद तराकी आणि पंतप्रधान अमीन हे चालवत आहेत. हे किती दिवस चालतं ते पहायचं. कारण त्याच्या शेवटाची सुरुवात केव्हाच झाली आहे.

क्रमशः

**(पुढील लेखांक : 'शोकांतिका : अमानुल्ला आणि सरय्या राणीची')**

बिंदुकथा

# प्रस्थान

बिंदुसार

साठ-सत्तर माणसांचा तो समूह वाट पहात होता. त्यात पँट-कोटवाले होते, धोतर-मुंडासेवाले होते. झगझगीत इरकली साड्यावाल्या कारभारणी होत्या. सिफॉन–जॉर्जेटवाल्या बाईसाहेब होत्या. दोन-चार मुले इकडे तिकडे धावत होती– पडत होती. मध्येच एखादी गाडी मागे–पुढे होत समोर उभी राही. तिच्यावरची पाटी मागून दिसत नसल्याने कोणी तरी धावत जाऊन पाटी पाही– निराश होऊन परत येऊन समूहातील गलक्यात भर घाली.

अडीचची गाडी हे त्या समूहाचे लक्ष्य होते. ज्यामधून व्हाव व्हावखेरीज फारसे काही ऐकू येत नव्हते अशा लाउडस्पीकरमधून निरनिराळ्या गाड्या अनिश्चित कालपर्यंत उशिरा सुटतील अशा घोषणा होत होत्या. समूहातील उत्साही लोक कंट्रोल-केबिनवर जाऊन चौकशी करून येत होते. 'लौकरच सुटेल', 'ड्रायव्हर–कंडक्टर नाहीत,' 'गाडीचे काम चालू आहे', 'आम्ही तरी काय सांगणार ?' अशी विविधतापूर्ण उत्तरे त्यांना मिळत होती.

साडेतीन वाजले. समूहाची चलबिचल वाढली. घरून निघताना आवरून–सावरून निघालेल्या रावसाहेब–बाईसाहेबांची शान पार खलास झाली. चुरगळलेल्या कपड्यात, विस्कटलेल्या केसांनी, मरगळलेल्या मनांनी माणसे शून्यपणे बाजूच्या कोलाहलाकडे पहात बसली.

काही वेळाने त्या फलाटावर एक गाडी उभी राहिली. ड्रायव्हर-कंडक्टर गाडी लावून कोठे तरी अदृश्य झाले.

गाडीच्या दाराशी तो सगळा समूह जमा झाला. दारापाशी धक्काबुक्की चालू झाली. प्रत्येकाच्या हातात गच्च पकडलेले तिकिट होते. गर्दीत एक–दोन चष्मे उडाले. कोणाची तरी टोकदार ट्रंक कोणाला तरी बोचली. कलकलाट चालूच होता.

कंडक्टर पानाची पिचकारी टाकीत आला. हाताने गर्दी बाजूला ढकलीत त्याने रुक्ष सुरात जाहीर केले–

'फक्त रिझर्व्हेशनवाले चढा.'

दार उघडल्यावर सगळेजण आत घुसले. पाच-सहा माणसे दारातच अडकून बसली. एक कोटवाले केविलवाण्या सुरात ओरडले,

'अहो, माझे रिझर्व्हेशन आहे.'

'मग आमचंही आहे.'

'आमचंबी आहे.'

असे आवाज उठले. मग एवढी रेटारेटी कशासाठी हा प्रश्न कोणालाच सुचला नाही. जगातली ही शेवटचीच गाडी आहे अशा भावनेने लोक गाडीला झोंबत होते. पंधरा-वीस मिनिटे, निरनिराळी माणसे दारात, मधल्या जागेत, अडकून मागच्या जागीच उभी होती. काही खाली वाकून बॅगा उलटयासुलटया करून बसवीत होती. एक बाई नवरा खालीच राहिल्याने घाबऱ्या घाबऱ्या तारस्वरात हाका मारीत होत्या.

कंडक्टरने हातातल्या चौकटीयुक्त मळकट कागदात डोके खुपसले.

एक टोपीवाले कडकपणे म्हणाले, 'ही बॅग कुणाची ?'

असे विचारून त्यांनी डोक्यावरच्या जाळीदार रॅकवरची एक बॅग उचलून खाली ओढली.

एवढ्या गर्दीतही त्या बॅगचा मालक तेथे टपकला व त्याने टोपीवाल्यांना हटकले,

'अहो, काय करताय ?'

'बॅग खाली ठेवतोय !' टोपीवाले तिरसट थंडपणे उत्तरले, 'माझी बॅग ठेवायचीय तिथं.'

'का पण ? मी आधी बॅग ठेवलीय तिथं.'

'माझ्या डोक्यावरच्या जागेत मी बॅग ठेवणार,' ठाम सुरात टोपीवाले.

'असा काही नियम आहे का ? आणि विचारायची काही रीत आहे की नाही ?'

एवढा संवाद चालू आहे तो दोघांच्यामधून चार माणसे व आठ बॅगा घुसल्या. आपला तोल सावरीत बॅगवाल्याने फर्मावले–

'माझी बॅग परत होती तिथे ठेवा. कंडक्टरला विचारून काय ते करू.'

टोपीवाले सामानाच्या गर्दीत दामटून बसत म्हणाले, 'कंडक्टरला काय विचारायचं? मला काही अक्कल आहे की नाही ? तुम्ही काय करायचं ते करा.'

आत येणारांच्या लोंढ्यात धक्के खात बॅगवाला आपल्यापुढील पर्यायांचा विचार करू लागला.

चौकटींचं पुरेसं निरीक्षण करून झाल्यावर कंडक्टर गाडीतील उतारूंची मोजदाद करू लागला. सुमारे पंधरा माणसे 'तशीच' घुसलेली त्याला आढळून आली. त्याने घोषणा केली –

'बिगररिझर्व्हेशन खाली उतरा.'

गाडीत एकच हलकल्लोळ उडाला. एव्हाना 'बिगर' तिकिटवाले आपापल्या सामानाचा ढिगारा रचून चांगले 'म्होरच्या' सीटांवर स्थानापन्न झाले होते. रिझर्व्हेशनवाले हातातील चिठोरी सांभाळीत, घायकुत्या मुद्रेने पॅसेजमध्ये उभे होते. गाडीत इतकी गर्दी झाली होती की, कोणी खाली उतरणे सोडाच, पण हात–पायही हलवू शकत नव्हते.

पावणेपाच वाजले होते. ड्रायव्हरने आपल्या चौकटीतून तोंड काढून विचारले, 'काय ढुमके, आज जायचीय की नाही गाडी ?'

कंडक्टरने 'माहितगार' हास्य केले व दात–ओठ खाऊन दरवाजा आपटीत 'डबल' दिली.

खडखड करणारी, दम टाकल्यासारखी वाटणारी गाडी जडपणे जागेवरून हलली. समूहातील बऱ्याच जणांनी सुटकेचा निश्वास टाकला. हातातल्या वर्तमानपत्राकडे नजर टाकली. एक–दोन पोरे खायला मागण्यास सुरुवात करू लागली. डोक्यावरून पदर ओढून घेत बायामाणसे मागे डोके टेकून झोपण्याची तयारी करू लागली.

एक फर्लांगभर गेल्यावर गाडी थांबली. आता काय झाले, अशा भावनेने साठ–सत्तर माना कंडक्टरच्या दिशेने वळल्या.

कंडक्टरने तिकिटे तपासण्यास सुरुवात केली होती. त्यावरून काही बोलाचाली सुरू होती.

कंडक्टर रेकून ओरडला, 'अहो पावणे, हे तिकिट माझ्या गाडीचं नाही.'

एक मुंडासेवाला हताश मुद्रेने उत्तरला, 'मग कंच्या गाडीचं हाये ?'

'हे साडेचारच्या गाडीचं तिकिट आहे.'

'पर ही गाडी त्या गावावरूनच जाती नव्हं ?'

कंडक्टरने रागाने मुंडासेवाल्याकडे पाहिले.

'अहो, पण ही गाडी तो स्टॉप घेत नाही. तुम्ही खाली उतरा बघू.'

'आता जाऊ द्या की सायेब.' मुंडासेवाला अजीजीने म्हणाला, 'मंडळी लई ताटकळलीयत.'

मंडळींचा कैवार घेतल्यावर गाडीतले चार–दोन लोक मुंडासेवाल्याच्या बाजूने धावले. 'जाऊ द्या–जाऊ द्या,' असा गलका झाला.

कंडक्टर त्रासून म्हणाला, 'तुमची गाडी कोणती हे तुम्हाला ठाऊक नाही ?'

बोचके छातीशी आवळीत मुंडासेवाला चोरटे हसला, 'आता आमाला काय कळतंय? आम्ही काय शिकल्यालं नव्हं–एक डाव जाऊ द्या मास्तरसाहेब.'

कंडक्टर निष्फळ रागाने काही तरी पुटपुटला, 'चेकर आला तर मी काय जबाब देणार?' एवढे बोलून त्याने डबल दिली व गाडी निघाली.

रखडत रखडत एक–दोन मैल गाडी गेली आणि जागीच उभी राहिली. त्रासिक मुद्रेने ड्रायव्हर उतरला व गाडीखाली शिरला !

□

कथा

# 'त्रिस्थळी यात्रा'

सौ. मीना लवाटे

आणि अखेर ती गेली. गेली म्हणजे संपली. इहलोकीची यात्रा संपवून परलोकात गेली. वयाच्या सोळाव्या वर्षापासून वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत जिने माझी सावलीपेक्षाही संगत-सोबत केली ती माझी सहचारिणी निर्वतली. सावली अंधार आल्यावर निघून जाते; पण अंधारात आणि प्रकाशात जिने मला सारखीच हसतमुखाने संगत केली ती माझी आर्यपत्नी मला एकटाच मागे ठेवून सोडून गेली. 'आता काही उपयोग नाही. आम्ही त्यांना अ‍ॅडमिट करून घेऊ शकत नाही. त्यांना जाऊनसुद्धा एक तास होऊन गेला. दवाखान्यात ह्यापूर्वीच त्यांना आणायला हवं होतत तर काही इलाज झाला असता.' माझा क्षणभर डॉक्टरांच्या वाक्यावर विश्वासच बसेना. फक्त दोन दिवस डोकं दुखायचं निमित्त झालं आणि तिची जीवनज्योत मालवली. सत्य हे वैशाखातल्या उन्हाळ्याचापेक्षाही प्रखर आणि तापदायक असतं; पण ते सूर्यप्रकाशाइतकंच स्पष्ट आणि स्वच्छ असतं.

□

'बास झालं. किती तो मेला शोक करायचा ! काय कुणाची बायको वारली का नसेल.' आमच्या सूनबाई आपल्या मैत्रीणीला म्हणत होत्या. बायको मेल्याचं दुःख स्त्रीला कसं समजू शकणार ? त्याला पुरुषच व्हायला पाहिजे ! नद्यांना खळखळाट करून ओरडत आरडत सागरापर्यंत धावता येतं; पण सागराचं तसं नाही. कधी उचंबळून लाटसुद्धा उंच उडवून चालत नाही; मग प्रवाहपतित होणं लांबच राहिलं. स्त्रियांची सगळी दुःख पुरुषापाशी समर्पित होतात; पण पुरुषांना समर्पित व्हायला जागाच नसते. फक्त त्याना सांभाळून घेणं ठाऊक असतं. सामावणं ठाऊक नसतं.

शैशव सोडल्यापासून ते म्हातारपण येईपर्यंत जिने आयुष्याची संगत कधी सोडलीच नाही, घराच्या कानाकोपऱ्यातून, रंध्रारंध्रातून तिचा श्वास अजूनही मला स्पष्ट जाणवतो आहे. तिला चार दिवसांत विसरणं कसं शक्य आहे ?

जोडव्यांच्या घुंगरांचा पायरव अजूनही माझ्या कानांत घुमतोय. ती नथ, तो खोपा त्यावर माळलेली मोगऱ्याची वेणी की जिचा वास अजूनसुद्धा दरवळतोय. हळूच हातावर ठेवलेला रायआवळा देताना झालेला पुसटसा स्पर्श अजून अंगावर काटा उभा करतोय. ''हे काय कुणी पाहील ना' हे आवळा घेतानाचे शब्द घुमतायत. आता ह्या क्षणीसुद्धा वाटतंय की, 'पान वाढलंय बरं का !' म्हणून दाराआडून हळूच शब्द येतील आणि आपण उठलो असं पाहून चटकन तुपाची लोटी हातात धरून वरण-भातावर तुपाची धार पडेल. मग तो वरण–भात चांगला लागतोय की, वाढणाऱ्या हाताला चव चांगली आहे हे समजायचंच नाही.

□

'इतकं मी म्हणतोय तरी आप्पाचं लक्ष नाहिये. अहो आप्पा, ऐकलंत का, म्हटलं चहा ठेवलाच. परत निवला तर मी गरम करणार नाही. गॅस जळतो !'

आप्पांना पटकन म्हणावंसं वाटलं, 'बाई ग, गॅस कसला मीच जळतो आहे. आतल्या आत, धुरासारखा. धड पेटसुद्धा घेता येत नाही !'

□

'अहो, आप्पा छत्री घेऊन जा बाहेर. पाऊस पडतोय. भिजाल !' कुठे तरी बरं वाटलं. मुलाना अजून तरी आपल्याबद्दल माया आहे तर. एवढं वाटतं न वाटतंय तोवर पुढचे शब्द गारांच्या मारासारखे येऊन आदळले, 'नाही तर ताप येईल आणि औषध–पाण्याचा खर्च !'

खरंच रे बाबा, आता तुला घाम गाळावा लागतोय, तेव्हा मला लागत होता. तापाने फणफणला होतास तेव्हा रात्रभर हाताचा पाळणा करून जोजवत होतो म्हणून तू आता रागाने फणफणतो आहेस. नेतो बापडा छत्री!

□

'इश्श, किती भिजायचं? आधी केस पुसा बघू. अहो, पदराने काय पुसताय ? सासूबाई आता देवळातून येतील आणि आधी तो गवती चहा द्या बघू !' सगळं तुझं आधी. आधीच पुराण असायचं म्हणून तू माझ्याआधी निघून गेलीस का ? आता या ऊनपावसात मला कोणाचीच संगतसोबत नाही !

लग्न होऊन माप ओलांडून तू आलीस आणि पहिलाच तुझा उखाणा मला आठवतोय. सलज्जवदना, पायाच्या अंगठयाकडे बघत तू म्हणालीस, 'संसारातील सुखदुःखांचा ऊन-पाऊस ही तर खरी इच्छा, पुरुषोत्तमरावांच्या संसाराला असू देत तुमच्या नेहमीच शुभेच्छा.' आता तर सगळीकडे ग्रहणच लागलंय.

□

'हे काय आप्पासाहेब, आज सकाळीच बसच्या रांगेत उभे ! अहो, कुठं जायचंय

तुम्हाला ? थंडी कोण पडलीय ! ह्या वयात अंगात स्वेटर वगैरे घालत चला. वहिनींनी किती प्रकारचे किती विणींचे स्वेटर विणले होते !'

तुम्हाला काय सांगू, 'अहो, सगळी विणच उसवून गेली आहे. मुलाची गाडी माझ्यासाठी नाही. सून आणि मुलगा महाबळेश्वरला चाललेत, म्हणून धाकटचाकडे रहायला चाललोय. म्हातारपण फार वाईट आणि तेही बायकोशिवाय म्हणजे काच फुटलेल्या चष्म्यासारखं आहे !'

¤

'अगोबाई, आप्पा, तुम्ही कधी आलात ? बरं का, आप्पा आलेत. आज गरीब मुलाची आठवण झालेली दिसत्येय आम्ही म्हणालोच, कधी तरी होईल आठवण !'

ही धाकटी सून. अनुनासिक स्वरात सगळं बोलणं. कोकणातली आहे. कोकणात जसं पाऊस पडत असला तरी अंगातून घामाच्या धारा निघतात, तसं बोलणं शीतल असलं तरी आरपार अंगाची लाही लाही होते.

धाकटचाचं घर तसं लहानच, म्हणजे थोरल्याच्या मानानं. खरं म्हणजे दोन्ही घरं माझीच. मीच निढळाचा घाम गाळून बांधली आणि माझ्यावरोबर वसुपण तितकीच खपली. त्या घर बांधण्यात घरपण होतं. जीवनाचं सार्थक होतं. आता घराला घरपण राहिलंच नाही. घरी–दारी खाणावळ झालीय. समोर ताट आणून आपटणार. लवकर उठलं तरच आंघोळीला पाणी मिळणार. नाही तर थेरड्याची अडगळ वाटणार.

चार–पाच दिवस कसं सगळं सुरळीत चाललं होतं; पण नंतर कुजबुज वाढली.

'तुम्ही आप्पांना सरळ सांगा. म्हणावं, दिवसभर इथं थांबलात तरी चालेल; पण रात्री झोपायला तिकडे जात जा. चांगल्या दोन जागा आहेत. इथं अडचण होत्येय, दिसत का नाही त्यांना ? पण डोळ्यांवर कातडं ओढल्यासारखं करायचं.'

मीच दुसरे दिवशी रात्री म्हणालो, 'मी मोठ्याकडे झोपायला जाईन.' त्यावरोबर धाकट्याचा चेहरा कावरावावरा झाला.

रात्री जागा मोठी म्हणून मोठ्याकडे झोपायला, मोठी सून आणि मुलगा दिवसभर बाहेर, म्हणून धाकटचाकडे जेवायला अशी आयुष्याची ओढाताण सुरू झाली.

वसु, तू मात्र सासू-सासऱ्यांचं आई-वडलांपेक्षा जास्त केलंस. आई म्हणायची, 'अरे, भांड्याला भांडं लागायचंच; पण वसुंधरा उगीच नाही मी तुला नाव ठेव म्हणाले. पृथ्वीच्या पोटात सोनं जसं राहतं तसं लोखंडही राहातं. ती पण आपल्यात सामावते बरं. सूनबाई सगळ्यांचं सारखंच मायेने करते हो !'

पण वसु, तू गेलीस आणि पायाखालची जमीनच नाहीशी झाली.

आणि परवा रात्री तर सगळ्यावर कळसच झाला. दिवसात दोनदा दोन टोकांकडे पायी जाणं-येणं होतं तरी झोप म्हणून लागेना. तुझी आठवण झाली. मी म्हणालो,

'तुम्ही दोघं आजच्या दिवस इथं झोपा. मला एकटचाला घर खायला उठतं. सगळं घर कसं ओकंओकं वाटतं.' त्यावर ज्याला लहानाचा मोठा केला, प्रसंगी पोटाला चिमटा काढून ज्याला वाढवला तो आपला मुलगा त्यावर एक शब्द बोलला नाही आणि तारस्वरात पाठोपाठ सूनबाई म्हणाली,

'काय झालंय एकटं न झोपायला ? सगळ्या गोवऱ्या ओंकारेश्वरावर गेल्या तरी अजून बायको पाहिजे का झोपायला ?'

असं वाटलं त्या क्षणी उठावं आणि दोन मुस्कटात ठेवून द्याव्यात आणि विचारावं, अग, कोणाला बोलते आहेस तू हे ? पण ती आणि तो दोघं नव्हतीच. ती केव्हाच गेली होती.

¤

जगात पती आणि पत्नीचं फक्त ती आणि तो एवढंच नातं नसतं. तारुण्याची वेस एकदा ओलांडली की, त्यात वासनेचा लवलेशसुद्धा शिल्लक रहात नाही. रहाते फक्त माया. अपार प्रेम. फक्त हवी असते संगत–सोबत. एकमेकांना मिळणारा एकमेकांचा आधार. तारुण्याचं वस्त्र रंगीबेरंगी असतं, पण वार्धक्याचं वस्त्र रंगहीन, वासनाहीन असतं.

पण त्याचे धागे मऊसूत, चिवट असतात. जसजसं वस्त्र धुवावं तसतसा त्याचा रंग जातो; पण ते अधिक अधिक भरतं. त्यातली पोकळी नाहीशी होते. तारुण्याचे रंग उडून जातात; पण ते मऊ वस्त्र उबेसाठी हवं असतं. एकमेकांच्या सहवासाची इतकी सवय जडली असते की, जरा डोळ्यांपुढून बाजूला झालं तर मन सैरभैर होतं. तारुण्यात विरह, हुरहुर असते. आता रहाते फक्त काळजी. काय सांगायचं ? त्याला म्हातारंच व्हावं लागेल. पाण्यातला मासा पाण्यातच कसा झोप घेतो ते पाण्यात राहिल्याशिवाय कसं समजणार ? त्याला मासाच व्हायला पाहिजे.

आणि आज धाकटचा सूनबाई म्हणाल्या, 'वाटणी देताना लेकीला पण भरभरून दिलीत ना ? मग आप्पांना म्हणावं, संध्याकाळी तिकडेच जेवायला जा. आम्हाला नाही परवडणार दोन्हीवेळा जेवण घालायला.' वाटलं सांगावं, अग, तुझ्या नवऱ्याला काही एकदा जेवण घालून वाढवला नाही.

¤

सकाळी धाकटचाकडे जेवण, संध्याकाळी मुलीकडे जेवायला आणि रात्री मोठ्याकडे झोपायला, अशी आमची मरेपर्यंत त्रिस्थळी यात्रा चालू राहणार. वृद्धाश्रमात कोणी पोहचवणार नाही. कारण त्यात त्यांची इज्जत जाते. मरेपर्यंत जगलंच पाहिजे. कारण आत्महत्येचं पातक मला नको आहे. झाडांनी सावली द्यायची असते; पण त्याला मात्र सावली कधीच मिळत नाही नाही म्हणायला वेलीचा गारवा असतो, पण आता तोही संपुष्टात आला आहे. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा...........

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

# पुस्तके

सतीश कामत

## दुष्टचक्र

**जीवनाचं ? मरणाचं ? की नियतीचं ?**

चि. त्र्यं. खानोलकरांच्या मृत्यूनंतर प्रकाशित होत असलेली 'दुष्टचक्र' ही बहुधा त्यांची पहिलीच कादंबरी. खास खानोलकरी धाटणीची. डोंगराच्या उतारावरच्या, माडा-पोफळींनी गच्चगार भरलेल्या, लाल मातीच्या गावात, अशा एका घरात घडणारी की जिथं कडीपाटाचा झोपाळा, जुनं लंबकाचं घड्याळ, रविवर्म्याची भितीवरची चित्रं, लटकणारं एक पंचाग, पारा उडालेला आरसा यापलीकडे मानवी संस्कृतीची फार चिन्हं आता नाहीतच आणि याचे साक्षीदार आहेत एम्. ए. ची परीक्षा देऊन सुट्टीला स्वतःच्या घरी आलेला एक तरुण विष्णु, आपलं वैधव्यच सौभाग्यासारखं व्रतस्थ ठेवणारी आणि मनावर ताबा ठेवण्यासाठी घाण्याभोवती फिरणाऱ्या बैलासारखं डोळ्यांवर झडपा घेऊन तोल राखणारी त्याची तरुण विधवा बहीण आक्का. स्वतः मनाने अतिशय दुबळा, भित्रा, 'शेणामेणा'चा असलेला; पण तरीही आक्कावर सुळ्यासारखं प्रेम करणारा गावातला मास्तर आणि सारं आयुष्य अंगवस्त्र ठेवून पशुवत् वागण्यात गेल्यावर आता रुद्राक्षमाळ ओढत, गीतापठण करणारा वृद्ध बाप तात्या– चार भिंतींच्या आड, चार व्यक्तींमध्येच घडणारी ही कादंबरी. नाही म्हणायला आणखीही दोन व्यक्ती इथं भेटतात. एक सोळा–सत्रातली, रसरसलेली, पहाताक्षणीच विष्णूला भुरळ पाडणारी आणि त्याचं मुंबईतल्या एका मुलीबरोबर आधीच प्रेम जमलेलं आहे हे कळल्यावर 'शिरा येवंदे माझ्या देखणेपणार. चलूक लागा ह्य् समसून' असं त्याला ठणकावून सांगणारी, रस्त्याकडेच्या झोपडीवजा चहाच्या खोपटातली मंजुळ आणि दुसरी त्या तरुणाची मृत आई– देवकेळीच्या बागेतल्या विहिरीतून हाक मारणारी किंवा 'विष्णु– हे हवंय कशाला तुला ? याचा मोह सोड तू–' असं सांगणारी. तिचेही प्राण या घरादारातून झऱ्यासारखे वाहत होते.

या सर्वांमध्ये विष्णु अतिशय अस्वस्थ असतो, सतत झगडत असतो– तात्यांशी, आक्काशी, मास्तरांशी, मंजुळाशी, दारातल्या कुत्र्याशी आणि स्वतःशीही ! फारसं काही कळत नसल्यापासूनच तो तिरस्कारच करत आला होता तात्यांचा. कारण एका तापलेल्या दुपारी त्यांनी आईला हातात पत्र्याची ट्रंक देऊन बाहेर काढलं होतं. असहाय्य अवस्थेत माहेरकडूनही ठोकरली गेलेली आई– त्या संध्याकाळी पुन्हा घरी आली. पहाटे विष्णूला जाग आली तेव्हा बरीच माणसं जमली होती. घरामागच्या विहिरीत आईनं जीव दिला होता. तो अपमान, ती असहायता त्या पतिव्रतेला पेलली नाही आणि याच क्षणापासून तात्याविषयी विष्णूच्या मनात अढी बसली. इतरांशी दिलखुलासपणे वागणारे तात्या आपल्याशी मात्र धड बोलतसुद्धा नाहीत, हे शल्यही जोडीला होतंच. एम. ए. ची परीक्षा देऊन विष्णु घरी येतो तेव्हा या आठवणीही त्याच्याबरोबर असतातच. जवळजवळ चाळिशीला आलेली आणि तरीही देखणी दिसणारी विधवा बहीण– आक्का हे विष्णूला असणारं एक कोडंच होतं. भातुकली खेळणारी एक मुलगी दुसऱ्या घरी गेली आणि अवघ्या सत्राव्या वर्षीच विधवा झाली होती आणि आता वृद्ध पित्याची सेवा करत एकाकी जीवन जगत होती. मनाचा कोंडमारा करून. विधवापणाचंसुद्धा एक खडतर व्रत असतं, असं मानणारी आक्का सर्व काही एका मर्यादेत ठेवू पहात होती. स्वतःचा आणि पर्यायाने घराण्याचा, माहेराचा तोल जाऊ नये म्हणून सतत जागरूक राहात होती. आक्काचं खरं मन विष्णूला कधी उलगडतच नव्हतं आणि त्यामुळं तो अधिकच अस्वस्थ होत होता.

गावातल्या भंडाऱ्यानं दारू पाजली म्हणून त्याचं घर सोडून विष्णूच्या दारी आश्रयाला आलेले दातेमास्तर हे असंच आणखी एक विक्षिप्त जीवन ! गळ्यात गोडवा असलेले मास्तर स्वभावाने अतिशय सज्जन, गरीब आणि भित्रेही ! तात्यांशी चाललेल्या युद्धात मास्तरांचा वापर करण्याचे डाव विष्णू रचत होता, तर वेडा-बावळा भावनाप्रधान मास्तर आक्कावर लुब्ध झाला होता. तिच्याशी लग्न झाले तर जीवनाला शिस्त येईल, म्हणत होता. 'या घरात एक पाहुणी आणू का ?' म्हणून तात्यांना विचारायला आलेला विष्णु, आक्का आणि मास्तरांचं परस्परांवरचं प्रेम पाहतो आणि पुन्हा सर्द होतो. घटना वेगानं घडत असतात आणि त्यांचा काही अन्वयार्थ लागण्याआधीच विष्णु नव्या गर्तेत ओढला जात असतो.

आईने जीव का दिला, हा आक्का आणि विष्णु या दोघाही 'दुबळ्या आईच्या' मुलांना पडलेला यक्षप्रश्न, तात्यांनी त्याचं दिलेलं उत्तर, 'रांडेपासून होणाऱ्या मुलाइतकंही महत्त्व मी तुला देत नाही.' असे

सांगून सारी जायदाद आक्काच्या नावे करून टाकणारे तात्या, 'मी मास्तरांशी लग्न करणार नाही', असं सांगणारी आक्का, 'विष्णू, तू घर सोड!' असे हवेतून येणारे मृत आईचे शब्द–हे सारं विष्णूला भंडावत असतं, अधिकाधिक चक्रावून सोडत असतं. तात्या हे त्याचे मुख्य शत्रू असतात आणि तेही आपल्या डावपेचांनी विष्णुला जेरीस आणत असतात. आक्काने जरी नकार दिला असला तरी तिचं मास्तरांशी थाटामाटानं लग्न लावून देण्याचा चंग चिवट, हेकट तात्यांनी बांधलेला असतो; पण या वेळी आक्का त्या अपराजिताचा पराभव करते. आजपर्यंत ज्या घरात त्यांच्या इशारावर माणसं जगत आणि मरत होती त्या घरात आयुष्याच्या संध्याकाळी तात्यांचा दारुण पराभव झाला. मास्तरांशी लग्न न करण्याचा निग्रह केलेल्या आक्कानं देवकेळीच्या बागेतल्या विहिरीत जीव दिला होता. आपल्या आईचाच मार्ग तिनं अनुसरला होता; पण आईची कृती ही एका मोडून गेलेल्या उद्ध्वस्त मनाची कृती होती, तर आक्काची कृती एकाच वेळी तिघांना उद्ध्वस्त करणारी होती.

जेव्हा फार काही घडण्यासारखं शिल्लकच राहिलेलं नसतं तेव्हा जेमतेम एका महिन्याच्या अवधीत घडणाऱ्या या घटना–काळापेक्षाही वेगाने आणि क्रूर!

'म्हटलं एम. ए. चा रिझल्ट लागेस्तोवर सगळं विसरून आपल्या गावी राहावं. आपल्या स्वतःच्या घरी थोरल्या विधवा बहिणीबरोबर आणि म्हाताऱ्या झालेल्या वडिलांच्याबरोबर थोडे दिवस सुख-दुःखाच्या गोष्टी करीत पुढील भविष्याचे बेत आखीत राहावं आणि जमलीच तर शिकारही करावी रानं जंगलातून भटकावं–भरल्या नदीच्या पात्रात यथेच्छ डुंबावं, परिचयाचं घरन्‌घर, झाडन्‌झाड, पशुपक्षी-सगळं काही पुन्हा एकदा अनुभवावं, पाहावं, इथं येण्याचा हा हेतू होता–' विष्णु कादंबरीच्या सुरुवातीला बोलत असतो आणि कादंबरीच्या शेवटी तो सांगतो–

'ती आर्तवाणी खंडित होईना. त्या अभंगाचे सूर स्मशान शांततेसारखे साऱ्या घरात पसरत होते. मी बाहेर आलो. बराच वेळ अवाक् उभा होतो घराच्या शेवटच्या पायरीवर–हाती बॅग घेऊन अवाक्'

मधल्या केवळ ऐशी पानांमध्ये प्रचंड वादळं उठली होती, संघर्ष पेटला होता आणि त्यामध्ये एक बळी गेला होता. तेव्हाच पुन्हा शांतता प्रस्थापित झाली होती. स्मशान-शांतता!

या कादंबरीचं आणखी एक वैशिष्टच म्हणजे तिची लांबी. अवघ्या चौऱ्याऐशी पानामध्ये एक अतिशय अस्वस्थ, सुन्न करून टाकणारी कथा सांगून खानोलकर मोकळे होते. इतक्या कमी जागेत वाचकाला या आधीही त्यांनी प्रभावित केलं होतं, त्यांच्या 'अगोचर' या कादंबरीत. 'दुष्टचक्र'मधली कथावस्तू मात्र 'अगोचर'शी मुळीच मिळतीजुळती नाही. मग त्या मानाने खानोलकरांच्याच 'रात्र काळी घागर काळी'मधल्या लक्ष्मीशी 'दुष्टचक्र'मधली आक्का कुठं तरी साम्य साधते आहे, असं वाटतं. खानोलकरांचा निसर्ग मात्र या तिन्ही कादंबऱ्यांमध्ये सारख्याच मुक्तपणे पसरला आहे. 'कोंडुरा'-मध्ये मात्र तो थोडा रौद्र वाटतो.

'दुष्टचक्र'मधली पात्रं हिमनगासारखी वाटतात. त्यांच्या मनाचा जो भाग दिसतो त्याचं विश्लेषण वगैरे तर काही करता येत नाहीच; पण दिसता दिसताच तो मध्येच अदृश्यही होतो. त्यांचं कुठलंही वागणं तार्किकतेच्या निकषावर घासणं अशक्यच! पण म्हणूनच ती जास्त जवळची वाटतात. अजूनही कोकणातल्या कुठल्या तरी दरिद्री खेड्यात असं जीवन असेल असं वाटतं.

'दुष्टचक्र'च्या मुखपृष्ठाचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. सुभाष अवचटांनी काढलेल्या या मुखपृष्ठामध्ये आधुनिकतेतील फक्त गुणच उतरले आहेत. त्यात सूचकता आहे, संदिग्धता आहे, आणि कादंबरीच्या कथावस्तूचं सारही त्यामध्ये नेमकेपणाने आलं आहे. दुष्टचक्राचा तुटकपणा आणि Continuity दोन्हीही अवघ्या सात इंचांमध्ये अवचटांनी अतिशय प्रभावीपणे दाखवली आहे. आक्काचं वैधव्य आणि सौभाग्य, विहीरीची कप्पी आणि लुगड्याच्या दशा हेही या मुखपृष्ठात उत्कृष्टपणे सूचित केलं आहे. कारण या तिन्ही गोष्टी जीवन-मृत्यूचंच प्रतीक आहेत.

एक थोडीशी विस्कळितपणा तरीही अत्यंत दमदार अशा कादंबरीची या निमित्ताने मराठी वाङ्मयात भर पडली आहे त्याबद्दल नीलकंठ प्रकाशन निश्चितच कौतुकाला पात्र आहे! *

**दुष्टचक्र**
कै. चि. त्र्यं. खानोलकर
नीलकंठ प्रकाशन, पुणे.
पृष्ठे–८४ किंमत–१२ रुपये.


१८५७ साली सारा उत्तर हिंदुस्तान पेटला होता. कानपूर, बिठूर, लखनौ, अयोध्या इथे कंपनी सरकारच्या विरुद्ध यज्ञकुंड पेटले होते. दिल्लीच्या बादशहाला पुन्हा एकदा तख्तनशीन करून कंपनी सरकारचा अंमल मोडून काढायचा होता. 'चलो दिल्ली' ही प्रत्येकाच्या मनातली प्रेरणा होती.

अशा वेळी प्रत्यक्ष दिल्लीमध्ये काय घडत होते? लाचखाऊ, संधीसाधू, मतलबी लोकांच्या घोळक्यात सापडलेला ८२ वर्षांच्या बहादुरशहा, शिपायांच्या अदम्य उत्साहाच्या मदतीने नियतीशी टक्कर देत होता. त्याच त्या कविमनाच्या दुर्दैवी बादशहाची ही शोकात्म कहाणी.

**बदनसीब**
**प्रतिभा रानडे**
किंमत : सोळा रुपये
**कॉंटिनेंटल प्रकाशन**
विजयानगर, पुणे

फिनिक्स ग्रंथालय

# Down the Seine And Up the Potomac

**By Art Buchwald**

हवेचे प्रदूषण, अन्नात भेसळ, औषधात भेसळ, ध्वनीप्रदूषण, पाण्याचे प्रदूषण वगैरे प्रदूषणांची आपल्याला इतकी सवय झाली आहे की, ही प्रदूषणे आपल्याला मिळाली नाहीत तर चुकल्यासारखे वाटते.

ध्वनीप्रदूषण असू शकते हे तर बऱ्याच लोकांच्या गावीही नसते आणि म्हणूनच ते मोटारींचे व स्कूटर्सचे हॉर्न टॅंएए... करीत ऐटीत मिरवतात. त्यामुळे म्हाताऱ्या-कोताऱ्यांना, लहान मुलांना, आजारी माणसांना किती त्रास होतो, त्याची पर्वा कोण करतो? शहरं म्हणजे काँक्रिटची जंगलं झाली आहेत. खऱ्या जंगलात सावज फाडून हिंसक प्राणी शक्य तेवढा जास्त वाटा लंपास करतात; पण मला एवढा मोठा वाटा मिळाला म्हणून मिरवत नाहीत. काँक्रिट जंगलात मात्र सावज फाडून माणूस माझ्या वाट्याला एवढा मोठा वाटा आला असे मिरवत जिभल्या चाटीत बसतो. एकदा प्रसिद्ध नाटककार युजीन आयेनोस्को म्हणाला होता, 'दया व प्रेम या आता मूर्ख कल्पना समजल्या जातात; पण आणखीन थोड्या वर्षांनी त्या कल्पनाच लोप पावतील.'

स्कूटर व मोटारगाडीनिर्मात्यांनी मृदू हॉर्नस् बनविण्याचा उपक्रम जरूर करून बघावा. प्रत्येक बाबतीत ट्रान्स्फर ऑफ टेक्नॉलॉजी झालीच पाहिजे असे नाही. ध्वनीप्रदूषणावर संशोधन पूर्ण झाल्यावर पाश्चात्य देशात या बाबतीत निश्चितच बदल होईल. जी व्यक्ती मोठमोठाले कारखाने काढते तिचा गौरव करण्यात येतो; पण सध्याच्या तरुणांनी कारखाने काढताना प्रदूषण कसे कमी करता येईल ते बघावे. असल्या तरुणांचाच गौरव करावा. ध्वनीप्रदूषणावरून पुण्याच्या सकाळच्या १०१ च्या भोंग्याची आठवण येते. या भोंग्याची चाचणी एवढ्या मोठ्यानेच घ्यायला हवी का? चाचणी दररोज आवश्यक असते का? का लोकांनी घड्याळं नीट लावावी म्हणून हे भोंगे वाजवले जातात? आणि वाजवावेच लागले तर त्याची डेसिबल लेव्हल कमी करता येणार नाही का? निदान पाच सेकंद हाय डेसिबल, २० सेकंद लो डेसिबल व परत ५ सेकंद हाय डेसिबल असे जरी केले तरी ध्वनीप्रदूषण कमी होईल. दिवाळी आली की शहरातले ध्वनीप्रदूषण व दारूच्या धुरामुळे हवेचे प्रदूषण इतके वाढते की, चार–पाच दिवस शहरातून पळ काढावा असे वाटते. प्रदूषण सहन करण्याचा प्रत्येक माणसाचा उंबरठा ( endurance threshold ) वेगवेगळा असतो. काही लोकांना ८०–९० डेसिबलसही जास्त होतात तर काहींना १००–११० चे काहीच वाटत नाही. ज्यांनी 'मेलडी मेकर्स' पाहिले आहे ( पहिल्या रांगेत ) त्यांना मला वाटतं १५०–१६० डेसिबलसही सहन होत असतील.

आवाजाचे प्रदूषण हे iceberg सारखे आहे. त्याने खोल मनात किती नुकसान होते त्याचे संशोधन सतत चालू आहे. ध्वनीप्रदूषणाने जीवनाचा दर्जा खालावतो. अर्थात् मनावर परिणाम झाला की, शरीरावर होणारच. सतत गजबजलेल्या आवाजात कुणी कुणाचा खूनही करू शकतो! अर्थात् या क्रियेत आवाजाचा वाटा किती आहे हे कदाचित् त्याचे त्याला कळणारही नाही. Sensory bombardment मुळे घडणारे गुन्हे हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल. इथे अल्बेर कामूच्या 'द आउटसाइडर'मधील एका पात्राची आठवण येते. अल्जेरियामध्ये सूर्याच्या प्रखर उन्हामुळे हे पात्र समोरच्या माणसाचा खून करते! भविष्यात कदाचित environment मुळे होणाऱ्या गुन्ह्यांसाठी कायद्यात बदल करावे लागतील. नुकताच एक युनायटेड नेशन्स एन्व्हायरनमेंट प्रोग्रॅम नैरोबी, केनिया येथे झाला होता. त्यात ध्वनीप्रदूषणामुळे एकट्या स्वीडनमध्ये १६००० लोक कमी–अधिक बधिर झाले आहेत असे लिहिले होते. आवाजामुळे तात्पुरते ब्लडप्रेशर वाढते. कान, नाक, घशाच्या व्याधी वाढतात. चिडचिडेपणा, मूडीनेस, मानसिक तणाव, भय या सर्व भावना आवाजाच्या iceberg चा फक्त वरील दर्शनीय भाग आहे. या पुस्तकात हवेच्या प्रदूषणाविषयी बुकवाल्ड कसे विनोद करू शकतात ते बघू.

आर्ट बुकवाल्ड म्हणतात की, शहरातील लोकांना प्रदूषणाची इतकी सवय झाली आहे की, ते नसले तर त्यांचा जीव कासावीस होतो. एकदा बुकवाल्ड फ्लेगस्टाफ, अरीझोना येथे गेला. ते एक टेकडीवरचे उंच ठिकाण आहे. विमानातून बाहेर पडल्यावर बुकवाल्डना एक विचित्र वास आला. 'हा कसला वास आहे?' असे बुकवाल्ड यांनी स्वागत करण्यासाठी आलेल्या एका व्यक्तीला विचारले. 'मला तर कसलाच वास येत नाही' असे ती व्यक्ती उद्गारली.

'अगदी ज्या गंधाशी मी परिचित नाही असा वास इथे खास आहे.' बुकवाल्डनी आपले पालुपद चालू ठेवले.

'अरे हो. तुम्ही इथल्या स्वच्छ हवेबद्दल बोलत असला पाहिजे. ज्यांनी शुद्ध हवा कधीच आपल्या फुप्फुसात घेतली नाही असे बरेच लोक इथे येतात.' स्वागतशील व्यक्ती म्हणाली.

'पण ही शुद्ध हवा आपल्याला करते तरी काय?' बुकवाल्डनी संशयित होऊन विचारले.

'ती तुमची फुप्फुसे सुधारते.' ती व्यक्ती म्हणाली.

'बरं ही हवाच आहे तर त्याने माझे डोळे का पाणावत नाहीत?' बुकवाल्डने आपल्या शंका पुढे चालू ठेवल्या.

'कारण घाणेरड्या हवेनेच डोळे पाणावतात. शुद्ध हवेने नाही!' असे त्या व्यक्तीने स्पष्टीकरण केले.

बुकवाल्डने इकडेतिकडे दृष्टिक्षेप टाकला तर सारे नितळ. हा नितळपणा पाहून त्याला कसेसेच वाटले. त्यावर त्या व्यक्तीने बुकवाल्डना धीर दिला, 'घाबरू नका. आम्हाला चाचण्यात असे कळून आले आहे, की रात्रंदिवस जरी तुम्ही स्वच्छ हवा छातीत ओढली तरी काहीही नुकसान होणार नाही!'

'मी इथून परागंदा होऊ नये म्हणून तुम्ही तसे म्हणता आहात. ज्या माणसांनी शहरात बरीच वर्षे काढली आहेत त्याला शुद्ध हवा फार वेळ मानवणार नाही– सोसवणार नाही–झेपणार नाही – पेलणार नाही!'

'मग तुम्ही नाकावर रुमाल दाबा व तीच ती घाणेरडी हवा फुफ्फुसात घ्या!'

'प्रयत्न करतो; पण येथे फक्त शुद्ध हवाच आसमंतात असते अशी जर मला आधी कल्पना असती तर मी बरोबर 'सर्जिकल मास्क' आणला असता!'

ते दोघे मोटारीत बसले व निघाले.

'काय, कसं काय वाटतंय्?' त्या व्यक्तीने बुकवाल्डला पृच्छा केली.

'मला शिंकाच येत नाही, त्यामुळे चुकल्यासारखे वाटतंय. आमच्या शहरात कधीकधी काही लोक सबंध दिवस तेच करतात.' बुकवाल्ड उत्तरला. 'इथं हवेचं प्रदूषण दिसत नाही!'

'फ्लॅगस्टाफचे औद्योगीकरण अजून झाले नाही. आम्हाला इथं धूर दिसतो तो फक्त रेड इंडियन्स जेव्हा एकमेकाला सिग्नल्स देतात तेव्हा आणि हा धूर सुद्धा फार वेळ टिकत नाही. वाऱ्यामुळे नाहीसा होतो.' त्या व्यक्तीने स्पष्टीकरण केले.

आता मात्र स्वच्छ हवेमुळे बुकवाल्डना चक्कर येऊ लागली. त्यांनी विचारले, 'अहो, इथे एखादी डीझेल बस नाही का? जीव कासावीस होतोय. त्या बसच्या exhaust ला नाक लावून थोडा कार्बन डायॉक्साइड हुंगला तर हायसे वाटेल!'

'बस नाही; पण एक ट्रक आहे. मी तुमच्यासाठी ड्रायव्हरला शोधून आणतो.' त्या गावंढळ माणसाने सांगितले. मग बुकवाल्डनी ड्रायव्हरला ५ डॉलर दिले व एक्झॉस्ट पाइपजवळ तो बसला. ड्रायव्हरने न्युट्रलमधे ट्रक उभा करून अर्धा तास एंजिन चालू ठेवले व बुकवाल्डचा जीव भांड्यात पडला! नंतर त्यांनी भाषण वगैरे दिले व लॉसएंजेलसला परतला. विमानातून उतरल्यावर त्यांनी धुराच्या वातावरणात एक जोराचा दम खेचला व त्यांच्या रोमारोमात नवचैतन्य सळसळू लागले! त्या धुराखेरीज त्यांनी वर त्यांच्या सिगारचाही एक झुरका घेतला असेल! प्रदूषणाचा जोड असर (synergistic action) व्हावा म्हणून! त्याला प्रदूषणाचे इतके व्यसन झाले आहे की, तो चर्चिलसारखा नेहमी एका भल्या मोठ्या सिगारचे झुरके घेत असतो. मला बुकवाल्डसारखे प्रदूषणाचे व्यसन कधी लागेल याची मी चातकासारखी वाट पहात आहे.

हा झाला बुकवाल्डच्या विनोदाचा एक मासला. असे किती तरी विनोदाचे इरसाल नमुने तुम्हाला त्यांच्या पुस्तकात वाचायला मिळतील आणि हे विनोद नेहमी ज्वलंत प्रश्नावर व चालू घडामोडींवर असतात. त्यांची सर्व पुस्तके घेण्याचा मी प्रयत्न करीत आहे; पण सहजासहजी ती मिळत नाहीत.

शेवटी एक चुटका वाचलेला आठवतो. तो बहुतेक बुकवाल्डनीच सांगितला आहे. एक नवोदित पत्रकार नोकरीसाठी एका संपादकाच्या ऑफिसमधे मुलाखतीसाठी बसलेला असतो. संपादकाने त्याला विचारले, 'या जगात अनुक्रमाने नं. १, २ व ३ चा खवचटपणा कोण करतं?' त्या पत्रकारानं उत्तर दिलं. "नं. १ बायको, नं. २ संपादक, नं. ३ घरमालक! या तिघांच्या कचाट्यातून मुक्त व्हायचे असेल तर ब्रह्मचारी राहून बंगला बांधावा व लिखाणाच्या फंदात पडू नये!' संपादक इतका खूष झाला की त्याने त्या पत्रकाराला नोकरीवर ठेवून घेतले!

—जे. एन्. पोंडा

---


## ग्रंथप्रेमींसाठी 'फिनिक्स'ने दिलेली जाहिरात

१. पुस्तके हाताळण्यापूर्वी हात स्वच्छ असल्याची खात्री करून घ्या.
२. पाने उलटताना ती काळजीपूर्वक उलटा.
३. पुस्तकात कोणतीही जाड अगर तीक्ष्ण वस्तू ठेवू नका.
४. खुणेसाठी पुस्तकाची पाने दुमडू नका.
५. पुस्तक वाचून झाल्यावर ते उन्हात अगर धुळीच्या जागी ठेवू नका.
६. लहान मुलांपासून पुस्तके दूर ठेवा.
७. उघडे पुस्तक पालथे ठेवू नका.
८. कोणताही पदार्थ खाताना अगर पिताना पुस्तक वाचू नका.
९. पुस्तकांची ने-आण करण्यासाठी एक स्वतंत्र व स्वच्छ पिशवी ठेवा.
१०. पुस्तक म्हणते, तैलात् रक्षेत्, जलात् रक्षेत्, रक्षेत् शिथिलबंधनात्।
मूर्खहस्ते न दातव्यम् एवं वदति पुस्तकम्॥

* पेट्रोल आणखीन महागणार, कंपल्सरी डिपॉझिटचे पैसे मिळाले नाहीत, गॅसला उशीर, ओनरशिप फ्लॅटचे भाव उत्तुंग शिखरावर, (कदाचित) आणखीन पडणाऱ्या स्कायलॅब्ज, १९८२ पासून ग्रहांची वेगळी स्थिती वगैरे अनेक कटकटी विसरण्याचा एकच रामबाण उपाय! पुस्तकात डोके खुपसा!! नुसत्या पुस्तकात नव्हे, 'फिनिक्स'च्याच पुस्तकात!!!

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०.**

रंगभूमी

# छिन्न

## प्रयोगात सावरलेले नाटक

काही कालापूर्वी मराठी रंगभूमी दादा आणि ताईच्या निर्मळ प्रेमात आकंठ न्हात होती. तुळशीवृंदावनाच्या छायेत सुखात नांदत होती. त्याची तीव्र प्रतिक्रिया म्हणूनच की काय आता ' लैंगिकते 'शिवाय तिचे पान हालनासे झाले आहे. लैंगिक, कामुक विषयांचे राजरोसपणे प्रेक्षकांसमोर येणे काही काल सांस्कृतिकदृष्टया गैर मानले गेले होते. तो काळ आता मागे पडला आहे. या विषयाचा बाऊ न करता तो खुल्या मनाने समजावून घेण्याचा आमचा आधुनिक दृष्टिकोन आहे. लैंगिक अनुभवामुळे एखाद्या व्यक्तीच्या जीवनाला मिळालेली बरी-वाईट वळणे, त्याचे तात्पुरते किंवा दूरगामी परिणाम याचे चित्र प्रेक्षकांसमोर येणे आता राजमान्य झाले आहे; पण तरीही जे दिसते ते पाहून खेद होतो. याचे कारण, बहुतेक ठिकाणी हा विषय काही तरी सनसनाटी निर्माण करण्याचे एक चलनी नाणे म्हणून वापरला जातो. प्रस्तुतच्या ' छिन्न ' या नाटकातही तेच घडले आहे.

इंडियन नॅशनल थिएटर निर्मित ' छिन्न ' या नाटकाचे लेखक आहेत श्री. वामन तावडे आणि दिग्दर्शक आहेत श्री. सदाशिव अमरापूरकर. या नाटकाचा तिसरा प्रयोग ११ ऑगस्ट या दिवशी विर्लेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाटचगृहात सादर झाला. जोराचा पाऊस सुरू असताना नाटचगृह पूर्णपणे भरून गेले होते. रविवारी पाच ऑगस्टला रवींद्र नाटचमंदिरात झालेल्या दुसऱ्या प्रयोगालाही धुव्वाधार पावसात अशीच तुडुंब गर्दी होती. तिकिटे न मिळाल्यामुळे कित्यक प्रेक्षक परत गेले होते. अशा या रसिक प्रेक्षकांना ' छिन्न ' या नाटकाने काय दिले ?

एका प्रौढ स्त्रीच्या कामवासनेमुळे एका कुटुंबात घडलेले महाभारत हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

दारुडे आप्पा, त्यांची पत्नी सिंधू आणि दोन मुले शाली आणि अरुण असे एक चौकोनी कुटुंब. श्रीकांत हा त्यांच्या घरात राहणारा अनाथ मुलगा. लहानपणापासून त्यांच्या घरात राहात असल्यामुळे कुटुंबाचाच एक घटक झालेला. वयात आल्यावर तो सिंधूच्या आकर्षणात सापडतो. त्याचे चोरटे संबंध सुरू होतात. श्रीकांत कायमचा जवळ रहावा म्हणून नाना खटपटी करून ती स्वतःची मुलगी शाली आणि श्रीकांतचे लग्न त्या दोघांच्या मनाविरुद्ध योजते आणि करायला भागही पडते. आपल्या नवऱ्याचे आणि आईचे संबंध कळून शाली अस्वस्थ होते. वेगळी निघते. तरीही खेचल्यासारखा श्रीकांत सिंधूकडे येत रहातोच. त्या दोघांना एकत्र पाहून अरुण आत्महत्या करतो. शेवटी शाली येते. अरुणचा फोटो घेऊन आलेल्या शांतारामशी प्रेमचेष्टा करू लागते. आई श्रीकांतशी कशी बोलली असेल ते संवाद कल्पनेने बोलू लागते. शरीराने आणि मनाने कोसळलेला श्रीकांत सरपटत शालीकडे जाऊ लागतो. येथे नाटक संपते.

विषयाच्या दृष्टीने कथानकात अनेक त्रुटी आहेत. नाटकातील उल्लेखावरून सिंधूच्या आयुष्यात अनेक पुरुष येऊन गेले आहेत एवढे कळते. याचे कारण कोणते ? एकदा ती नवऱ्याला म्हणते, ' तुमच्या घराण्यातच दोष. तुमच्या माणसांनी मला बदनाम केलं! ' यावरून हिचा नवरा पुरुष नव्हता म्हणून ही बेछूट झाली. एकदा ती नवऱ्याला म्हणते, ' अरुणच्या जन्मानंतर मढं झालं तुमचं ! ' याची संगती कशी लावायची ? तिच्या बोलण्यातल्या निसटत्या उल्लेखावरून वाटते, निसर्गतः ती वखवखलेली स्त्री आहे. तिचे व्यक्तिमत्त्व एकसंधपणे उभेच रहात नाही. नाटकातील ही मध्यवर्ती भूमिकाच अनेक तडे गेले असल्यामुळे कोसळते. आप्पा मधेच सिंधूवर तावातावाने थुंकतो. मधेच अगदी लाचार होतो. माणसे अशी वागत नाहीत असे नाही; पण त्याची पुरेशी कारणे नाटकात येत नाहीत. शालीला आई-श्रीकांत प्रकरण कसे कळते हेही प्रेक्षकांना समजत नाही. लोकांकडून म्हणावे तर तिच्या लग्नापूर्वी लोक काहीच बोलत नसतील का ? दारुडा आप्पा पलंगावर शालीच्याच जवळ येऊन झोपतो. सिंधू त्याला निकराने बाजूला ओढायचा प्रयत्न करीत सांगते, 'अहो तिथे शाली झोपली आहे! 'तो ऐकत नाही. मग अगतिकपणे सिंधू येऊन दुसऱ्या बाजूला श्रीकांतच्या छातीवर विसावते. या दृश्यातून नेमके काय सुचवायचे आहे ? एका बाजूला निर्मळ मनाचा आप्पा, दुसऱ्या बाजूला वासनेनं वखवखलेली त्याची पत्नी असा विरोध दाखवायचा असू शकेल. एखाद्याच्या बाबतीत स्वतःच्या मुलीच्या बाजूला आडवे होणे हे त्या व्यक्तीच्या मनाचा निर्मळपणा कितपत सिद्ध करू शकते याची शंकाच वाटते. भाजीवाली, आप्पांचा दारुडा मित्र ही पात्रे पूर्ण अनावश्यक वाटतात. शालीचे लग्न होऊन शाळा संपली तरी गणवेष नेहमीच्या वापरण्याच्या कपडचासारखा ठेवलेला होता. याच कपडचात मधेच एक ' ब्रा ' आतल्या बाजूने ठेवली गेली आणि काढून घेतली गेली. श्रीकान्त त्यामुळे चाळवतो असे दाखवायचे असावे आणि सुरुवातीला ती ठेवण्याचा विसर पडला असावा. जमले तर प्रेक्षकांनाही चाळवायचा प्रयत्न असावा. शालीने आईला मारण्यासाठी आणलेला घरातला वापरता पाटा नुकतीच टाकी मारलेला कोराकरकरीत वाटत होता. जाऊ दे ! दोषांची यादी तरी किती द्यायची !

नाटकाचा प्रयोग एकंदर ठीक होता. स्मिता पाटील ( शालू ), श्याम चिपळूणकर ( शांताराम ) बिराज चिटणीस ( अरुण ), आशालता ( सिंधू ), सदाशिव अमरापूरकर (अप्पा), नलिनी कानिटकर (भाजीवाली), दिलीप कुलकर्णी (श्रीकांत), सुशाल गोलतकर (दारुडा), श्याम विश्वासराव (पोलिस) या सर्व कलाकारांनी आपापल्या भूमिका व्यवस्थितपणे सांभाळल्या. विशेष उल्लेखनीय अभिनय श्री. दिलीप कुलकर्णी यांचा वाटला. शालीशी पैजा मारणारा, तिच्यावर प्रेम करणारा, तरीही सिंधूकडे खेचला जाणारा श्रीकांत त्यांनी कोणताही भडकपणा न करता सहजपणे साकार केला. नेपथ्यकार गौतम जोशी यांनी कनिष्ठवर्गीय कुटुंबवत्सल माणसाचे घर अगदी योग्य रीतीने मांडले होते. पार्श्वगीताने विशेष कोणताही परिणाम साधला नाही.

लेखनात सवंग आणि प्रयोगात ठीक असे हे एक निरर्थक नाटक आहे.

—विनया खडपेकर

# चित्रपट

सदानंद बोरसे

# सिनेमा सिनेमा

## कसे आम्ही ? कसे आम्ही ? असे आम्ही, असे आम्ही !

कोणतेही एक गाव– असे गाव ज्यात एक तरी थिएटर आहे. थिएटरचे नाव, अं– समजा एडवर्ड. तर या थिएटरला एक सिनेमा लागला आहे. सिनेमाची वेळ होते आणि थिएटरबाहेर हळूहळू गर्दी जमू लागते. फेरीवाले, रिक्षावाले, भेळवाले आणि हो, प्रेक्षक. त्या अरुंद खिडकीच्या अलीबाबाच्या गुहेतून तिकिटे मिळविण्यासाठी मोठी रांग लावून उभे प्रेक्षक. एकदा तिकिटे हातात पडली की, स्वर्ग हाती आल्याच्या आनंदाने उजळणारे प्रेक्षक. रांगेत पार मागे टोकाशी उभे, कंटाळलेले, पण चिकट आशावादाने थांबलेले प्रेक्षक. रांगेत मध्येच अलगद घुसखोरी करणारे बिलंदर प्रेक्षक. त्यांना फक्त शिव्या घालणारे तत्त्वनिष्ठ प्रेक्षक. अचानक खिडकी बंद होऊन 'हाउस फुल'चा बोर्ड लागल्यावर तणतणणारे, चिडणारे प्रेक्षक. नंतर सुरू होणाऱ्या 'दो का पाँच, दो का पाँच'ला प्रतिसाद देऊन कष्ट सार्थकी लागल्याने कृतार्थ झालेले प्रेक्षक. बाहेरची ही गर्दी चिरत आपण थिएटरमध्ये शिरतो.

आतही आपल्याला भेटतात प्रेक्षकच.

अगदी अशोककुमार, बलराज सहानींच्या ऐन जवानीतील चित्रपटांपासूनचे सर्व चित्रपट पाहिलेल्या एखाद्या बुढ्ढ्या मुल्लापासून चित्रपटाला येऊन चोरी चोरी प्रेम करणाऱ्या तरुण युगुलापर्यंत सर्व वयांचे, सर्व तऱ्हेचे, सर्व चवींचे प्रेक्षक त्या ठिकाणी बसलेले. या सगळ्यांचा मिळून एक मोठा थोरला प्रेक्षक झालेला. चित्रपटातील संवादांपासून, गाण्यांपासून सर्व काही त्याला पाठ असते, हिरोच्या स्कूटरच्या नंबरपासून हिरॉइनच्या साडीवरील डिझाइनपर्यंत सर्व गोष्टींची त्याला माहिती असते. जगातील पहिल्या चित्रपटात काम केलेल्या पहिल्या कलाकारापासून आजच्या लेटेस्ट हिरोपर्यंत सगळ्यांबद्दलच्या परस्परविरोधी तुलना त्याच्या डोक्यात घुमत असतात. या प्रेक्षकाच्या नाकावर एक बारीकसा टीकाकाराचा चष्मा आहे, सर्व चुका लक्षात येऊनही त्या पोटात घालणारे उदार मन आहे; त्यामुळे सिनेमा कसाही असला, तरी तो सिनेमाला येतोच. हा प्रेक्षक तसा बाहेरच्या जगात व्यवहारी अन् हिशेबी आहे; पण देवळात जाताना बाहेर चपला काढून ठेवाव्यात तसा सिनेमाला येताना भाविकपणे तो आपला हिशेबीपणा थिएटरबाहेरच काढून ठेवतो. हा प्रेक्षक तसा बाहेरच्या जगात संयमी अन् विवेकी आहे; पण बंदिस्त स्नानगृहात जाताच अंगावरचे सर्व कपडे उतरवून निसर्गावस्थेत उन्मुक्तपणे स्नानाचा आनंद घ्यावा तसा थिएटरमध्ये आल्यावर आपला विवेक थोडासा उतरवून ठेवून तो स्वैर होतो. यातही त्याच्यावरचे पिढ्यान् पिढ्यांचे पारंपारिक संस्कार जागेच असतात; त्यामुळे चित्रपटातील पात्रांबरोबर तो हसतो, रडतो, गातो, बेभानपणे नाचतोसुद्धा. हिरो जिंकायला लागला की त्याला आनंदाच्या उकळ्या फुटतात, हिरॉइनवर बलात्कार होऊ लागला तर रागाने त्याचे पित्त खवळते.

तर अशा या मोठ्या प्रेक्षकासमोर एका कृष्णा शाह नावाच्या माणसाचा सिनेमा चाललेला. याच माणसाचा एक 'शालिमार' नावाचा चित्रपट गदळ आणि भिकार ठरवून त्या प्रेक्षकाने कोपऱ्यात भिरकावून दिलेला. त्याच प्रेक्षकासमोर कृष्णा शाह नवीन सिनेमा सादर करतो आहे. या सिनेमात संपूर्ण चित्रपटसृष्टीचा काहीसा बंदिस्त इतिहास आणि काही अन्य पैलू कृष्णा शाहने सादर केलेले. हा इतिहास आणि हे पैलू तसे महत्त्वाचे आहेत– भारतात अगदी सुरुवातीला झालेला परकीय मूकपटाचा कार्यक्रम, त्यातून स्फूर्ती घेऊन दादासाहेब फाळक्यांनी स्वत: केलेली चित्रनिर्मिती आणि त्यातून भारतीय चित्रपटसृष्टीची झालेली सुरुवात, सुरुवातीला निघालेले पौराणिक चित्रपट, त्यानंतर आर्देसीर इराणींच्या 'आलम आरा' या पहिल्या भारतीय बोलपटाने रोवलेली मन्वंतराची मुहूर्तमेढ, दरम्यान ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध परतंत्र भारताच्या संघर्षाचा भारतीय चित्रपट आणि चित्रपटव्यवसायावर होणारा परिणाम, पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाचा, स्वातंत्र्याचा आणि स्वातंत्र्यानंतर झालेल्या फाळणीचा, जातीय दंग्यांचा चित्रपटविषय आणि व्यवसायावर झालेला परिणाम, भारतीय व परकीय निर्मात्यांची प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी चाललेली झुंज हा सगळा इतिहास वाचलेला वा एकलेला असला, तरी पाहिलेला नसल्यामुळे आणि पार चार्ली चॅप्लिनच्या चित्रपटांपासून राजा हरिश्चंद्र, आलमआरा, शहीद (जुना), फूटपाथ, दो बिघा जमीन इत्यादी चित्रपटांमधील सर्व संदर्भदृश्ये त्या त्या वेळी दाखविल्यामुळे हा ऐतिहासिक भागही पुरेसा मनोरंजक झाला आहे. त्याचप्रमाणे भारतीय चित्रपटांमधील सुरुवातीचा पौराणिक चित्रपटांचा काळ; रंजनच्या तलवारबाजीने व फिअरलेस नादि-

याच्या साहसांनी भरलेले स्टंटपट, भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे चित्रण करणारे चित्रपट, बेकारी, जातीय दंगे, खेड्यांतील शोषित शेतकरी, अस्पृश्यता इत्यादी कित्येक सामाजिक समस्यांचा विचार करणारे चित्रपट, निखळ करमणूक करणारे चित्रपट येथपासून ते आज केवळ धंद्याला बसलेल्या तकलादू मसाला चित्रपटांपर्यंत चित्रपटांचे अनेक पैलू आहेत. हा इतिहास आणि पैलू दाखवताना लोकप्रिय चित्रपटांमधील निवडक दृश्ये एकत्र गुंफून त्यातही लोकप्रिय गीतांना प्राधान्य देऊन हा सगळा भाग कंटाळवाणा होणार नाही याची उत्तम काळजी घेतली आहे. त्यासाठी मग त्यात 'मेरे पिया गये रंगून, वहाँ से किया है टेलिफोन' आहे, 'गोरे गोरे ओ बाँके छोरे' आहे, 'आ जा री आ, निंदिया तू आ' ही लताची कर्णमधुर लोरी आहे, 'खय के पान बनारसवाला' हे किशोरचे लोकप्रिय खिकाळणे आहे, 'जाऊँ तो जाऊँ कहाँ'मधला तलतचा कापरा दर्द आहे, 'जीवन के सफर में राही मिलते हैं बिछड जाने को' हेही हसत सांगणारा अवखळ किशोर आहे, 'जब प्यार किसी से होता है' आणि 'बिछडे सभी बारी बारी' दोन्ही सारख्याच ताकदीने पेलणारा रफी आहे, सैगलसुद्धा आहे. 'आवारा'तील भव्य स्वप्नगीत आहे, तर आपल्या डोळे दिपवणाऱ्या भव्यतेने सर्व चित्रपटभर भारून टाकणारे सिकंदर, चंद्रलेखा, मुगले आझम आहेत. दिलीपकुमारची पुटपुटती संवादफेक आहे, अँग्री यंग मॅन अमिताभचे बुलंद आवाजातील गुरगुरणे, चिडणे आहे, 'अलबेला'तील 'शाम ढले' वा 'भोली सूरत'मधील अवखळ प्रणयापासून 'मुगले आझम'मधील हळुवार हळव्या प्रणयापर्यंतच्या वेगवेगळ्या छटा आहेत, 'दीवार', 'शालिमार'मधील दे दनादन मारामारी आहे, गुरुदत्तची उदात्त कलात्मकता आहे. ज्याला जे हवे ते सगळे काही आणि सगळे जण— राजकपूर, देव आनंद, दिलीपकुमार ते राजेश खन्ना, अमिताभ, धर्मेंद्रपर्यंत आणि नलिनी जयवंत, मीनाकुमारी, मधुबाला, गीताबालीपासून झीनत, हेमापर्यंत सगळे जण आणि सगळ्या जणी आहेत. तर हे तसे महत्त्वाचे आहेच; पण फक्त एवढेच असते, तर कदाचित या चित्रपटाला टी. व्ही. वरील छायागीतापेक्षा फार तर थोडे माहितीपूर्ण छायागीत म्हणू— फार वेगळे स्वरूप आले नसते, एक वेगळा विषय आणि एक वेगळी हाताळणी यामुळे एक वेगळा चित्रपट म्हणून अस्तित्व आले नसते; पण त्याशिवाय— ज्या आधी उल्लेख केलेल्या प्रेक्षकासमोर हा चित्रपट दाखवला गेला आहे, त्याच्या या चित्रपटाच्या वेळच्या, पडद्यावर चित्रपट चालू नसताना पण चित्रपटाच्या वेळेतील ज्या प्रतिक्रिया टिपल्या आहेत, त्यामुळे चित्रपट म्हणूनही 'सिनेमा सिनेमा' महत्त्वाचा ठरतो.

अगदी चित्रपट सुरू होण्यापूर्वी थिएटरबाहेर जमलेल्या गर्दीपासून 'THE END' पडद्यावर येईपर्यंत या प्रेक्षकाचे नानाविध उद्योग कृष्णा शाहने दाखविले आहेत, नानाविध उद्गार ऐकवले आहेत, त्याचे नानाविध मुखवटे उडवले आहेत, त्याला नानाविध मुखवटे चढवले आहेत. कित्येकदा त्याला चिडवले आहे, लाजवले आहे, कधी कधी तर अचानकरीत्या पकडून ओशाळेसुद्धा बनवले आहे. या सगळ्याची उदाहरणे—तीही फोडून सांगायची; त्यापेक्षा सिनेमा सिनेमा पाहताना आपण स्वतः त्याचा अनुभव घ्यावा, हे उत्तम. कित्येकदा तर आधी प्रत्यक्ष थिएटरमध्ये एखादा प्रकार घडतो आणि मग त्याचे हुबेहुब प्रतिबिंब आपल्याला 'सिनेमा सिनेमा'मधील त्या थिएटरमध्ये पाहायला मिळते. उदाहरणार्थ—पडद्यावर 'जंगली'मधील 'याऽऽहू' चालू असताना अचानक आवाज बंद होतो. लगेच थिएटरमध्ये (प्रत्यक्ष) 'आवाज, आवाज'चा ओरडा होतो. मग लक्षात येते की, चित्रपटातच दृश्य असे आहे की, आवाज बंद झाला आहे आणि मग ऐकू येते ती चित्रपटातील 'आवाज आवाज'ची आरडाओरड —जणू आपण आधी केलेल्या गलक्याचा प्रतिध्वनीच. चित्रपटात दाखवलेले प्रेक्षकांचे नमुनेसुद्धा तुमच्या आजुबाजूलाच असतात, थोडे बारकाईने पाहिले तर पडद्यावर एखादा चेहरा तुमचाही असतो आणि तुमच्या आजुबाजूला एखादे मिठीत गडप झालेले जोडपे असते. सीटच्या हातावर हात ठेवण्यासाठी एकमेकांवर सतत कुरघोडी करण्याचा प्रयत्न करणारे शेजारी असतात, झोपण्यासाठी सिनेमाला आलेला कुंभकर्ण असतो, ऐन मोक्याच्या प्रसंगी किरकिरणाऱ्या पोरावर त्रासलेली माता असते, आपल्या काकदृष्टीच्या आणि न्यू वेव्ह चित्रपटांची आवड असलेल्या बुद्धिवादी पतिराजांबरोबर आलेली पडद्यावरील शंकरावर हळद-कुंकू उधळणारी फॅशनेबल श्रद्धाळू गृहिणी असते. तत्त्वनिष्ठ महाराष्ट्रीय माणूस असतो, आडव्या डोक्याचा सरदारजी असतो, चित्रपट पाहताना ट्रान्झिस्टरवर कॉमेंट्री ऐकणारा आणि 'आउट आउट'चा गजर करणारा क्रिकेटशौकीन असतो, अट्टल दारुडा असतो, अगदी एखादा तृतीय पुरुषी एकवचनी बृहन्नडसुद्धा असतो—पडद्यावर हे सारे तुमच्या आजूबाजूला असतात आणि पडद्याबाहेरही तुमच्या अवतीभवतीच असतात.

या साऱ्या समुच्चयाचा मिळून बनणारा प्रेक्षक गुरुदत्तसाठी हळहळतो, दिलीप अभिनेता म्हणून श्रेष्ठ का अमिताभ असा वाद घालतो, अजूनही चॉकलेटी असलेल्या देव आनंदवर फिदा होतो, 'भोली सूरत दिल के खोटे'ला नाचतो, हिरॉइनवर बलात्कार झाला तर रागाने मुठी आवळतो, 'मुंगळा, मुंगळा'ला बेभान शिट्ट्या घालतो, 'दम मारो दम'ला झिंगतो, अगदी एखाद्या 'हुस्न के लाखो रंग'ला अस्वस्थसुद्धा होतो. हेच सगळे कृष्णा शाहने दाखवले आहे, जणू प्रेक्षकांपुढे आरसा धरला आहे.

ह्या आरशातील रूपडे पाहताना काही गोष्टी मात्र खटकल्या. एक—काही गोष्टींची झालेली अतिशयोक्ती. उदाहरणार्थ— फिल्म तुटल्यावर थिएटरची धडाधड मोडतोड करण्याइतकी दंगल दाखवणे म्हणजे जरा जास्तच. दोन— काही अतिशय लांबवलेली दृश्ये. उदा. 'शोले'मधील गब्बरसिंगचे दृश्य. तीन— चित्रपटसृष्टीतील सर्वच पैलू दर्शविणे हा या चित्रपटाचा उद्देश नव्हता, ते शक्यही नव्हते हे मान्य; पण चित्रपटधंद्याचे दर्शन घडविण्यासाठी आणि त्यावर झीनत अमान या फडतूस बाईच्या काही रद्दी कॉमेंट्स ऐकवण्यासाठी चित्रपटाचा मध्यंतरानंतरचा मोठा भाग खर्च करणे आवश्यक होते का? आमच्याकडे प्रेक्षकाकडून पैसा वसूल करण्यासाठी मसाला कसा ठासला जातो, यावर झीनत अमानने काही बोलणे म्हणजे 'नौ सौ चूहे खाकर बिल्ली चली हाज' असलाच निर्लज्जपणा आहे. चार— चित्रपटामध्ये धर्मवीर, शालिमार, दीवार असल्या चित्रपटांची

चार-चार, पाच-पाच दृश्ये तीही भरपूर लांबीची दाखवून आणि सतत कॅमेरा धर्मेंद्र, अमिताभ, हेमा, झीनत अशा आजच्या चलनी नाण्यांवर ठेवून जागा भरून काढण्याऐवजी अन्य चित्रपटांमधील अन्य अधिक चांगली दृश्ये निवडण्याचा चोखंदळपणा दाखवायला हवा होता. पाच– चित्रपटातून दाखवलेला भारतीय प्रेक्षक हा बराचसा खरा दाखवला आणि ऐकवला असला, तरी तो पूर्ण तर नाहीच; पण अतिशय उथळही दाखवला आहे. खुद्द कृष्णा शाहची 'शालिमार' ही मुद्दाम जमवलेली भट्टी या प्रेक्षकाने ओतलेल्या धडाधड पाण्यात नुसती विझली नाही तर पार वाहून गेली. याउलट गुरुदत्तच्या प्यासा, कागज के फूल ला, हृषिदांच्या आनंदला, गुलजारच्या खुशबू, आँधीला आणि अशा कित्येकांच्या कित्येक कलात्मक चित्रपटांना या प्रेक्षकाने उदार आश्रय दिलेला आहे. कृष्णा शाहने दाखविलेल्या प्रेक्षकाची ही रसिकता, माझ्या मते, चित्रपटात पुसटशी स्पर्शिली जाणे आवश्यक होते.

असो. संपूर्ण चित्रपटात सर्वांत अवघड काम बनले होते संकलकाचे; पण संकलक अमित बोस यांनी ते अतिशय सुंदर पार पाडले आहे. अन्यथा इतक्या विविध ठिकाणांहून जमा केलेल्या विविध दृश्यांचा एकत्रित परिणाम साधणारा क्रम बिघडविणे फारसे अवघड नव्हते.

हेमामालिनीचे चित्रपटामागे चालणारे निवेदन सर्वात सुरेख. त्यानंतर अमिताभचा क्रमांक. धर्मेंद्रचे निवेदन सामान्य व चांगले–वाईटपणाच्या सीमेवर रेंगाळणारे. झीनत अमानचे निवेदन मात्र– छे, सांगता येत नाही. कारण वाईट, गदळ, भिकार, टुकार इत्यादी साऱ्याच शब्दांना शेवटी मर्यादा आहेत.

चित्रपट संपल्यानंतर बाहेर पडलो.

नंतर मात्र कोणत्याही सिनेमाला गेलो आणि पडद्यावर कोणताही सिनेमा चालू असला तरी थिएटरमध्ये आजूबाजूला मात्र 'सिनेमा सिनेमा'च चालू असतो.

# चित्रपटाबाहेर....

'सत्यकाम' या चित्रपटाचं शूटिंग चालू असतानाचा एक प्रसंग फिल्म इंडस्ट्रीत वेळेवर येण्याचा विषय निघाला की अजूनही सांगितला जातो. शर्मिला टागोर या चित्रपटाची नायिका होती आणि हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शक! शूटिंग दुपारी सुरू होणार होतं; पण संध्याकाळ उलटून गेली तरी बाईसाहेबांचा पत्ता नाही. शेवटी रात्री ९॥ वा. शर्मिला स्टुडिओत आली. सर्व युनिट वाट पाहून कंटाळलं होतं; पण शर्मिलाला आलेलं पाहिलं आणि एक शब्दही न बोलता हृषिदा तिथून निघून गेले.

याचा परिणाम असा झाला की दुसऱ्या दिवशी हिरॉइन अगदी वेळेवर, थोडीशी वेळेच्या आधीच स्टुडिओमध्ये हजर! पण आज हृषिदांचाच पत्ता नव्हता. काल रात्रीचा राग अजून ओसरलेला नाही, हे शर्मिलाने लगेच ओळखलं आणि एक फुलांचा टवटवीत गुच्छ हृषिदांना पाठवला. तेव्हा कुठे स्वारी पुन्हा मूडमध्ये आली आणि 'सत्यकाम'चं शूटिंग सुरू झालं.

पण आज ही परिस्थिती पार बदलून गेली आहे. आजच्या नट-नटचा ठरलेल्या वेळेवर तर सोडाच, पण ठरलेल्या दिवशी जरी सेटवर आले तरी निर्माते–दिग्दर्शक अगदी खूष होऊन जातात. शिवाय हल्ली गुच्छ पाठवण्याची प्रथा फिल्मवाल्यांपेक्षा राजकारण्यांमध्ये जास्त पॉप्युलर आहे, हे निराळंच.

हे सगळं जरी असलं तरी प्राण हा जुन्या वळणाचा सज्जन नट अजूनही कुठल्याही सेटवर अगदी वेळेवर हजर होत असतो आणि ते सुद्धा मेकअप वगैरे करून. पण म्हणूनच परवा 'ताकद'च्या सेटवर प्राणवर अगदी निराळीच आफत आली. नेहमीप्रमाणे तो वेळेवर जाऊन पोचला. अजून कोणाचाच पत्ता नव्हता. बराच वेळ गेला. निर्मात्याला काय करावं कळेना. शेवटी तो प्राणसमोर जाऊन उभा राहिला आणि हात जोडून म्हणाला.

'प्राणसाहेब एक विनंती आहे.'

प्राणला वाटलं, बहुधा हा आर्थिक अडचणीत आला असावा. म्हणून प्राण म्हणाला,

'ठीक आहे, मी काही तुझ्याकडे आजच्या शेड्यूलचे पैसे मागणार नाही.'

'नाही साब, अडचण ती नाही. आपण इथून पुढे नेहमी सेटवर थोडं उशीरा यावं. फक्त काही तास उशीरा!'

प्राण फक्त हसला आणि नंतर आपल्या एका मित्राला म्हणाला, 'आजपर्यंत माझ्याकडून अशा तऱ्हेचं सहकार्य कोणीही मागितलं नव्हतं.'

महाराष्ट्र सरकारच्या मुंबईतील फिल्म सिटी स्टुडिओजला आजपर्यंत सगळ्यात जास्त भाडं बी. आर. चोप्राने दिलं आहे. त्याची ती गाजलेली 'जळती रेल्वेगाडी' अजूनही या स्टुडिओत नट-नटचांची वाट पहात ताटकळत आहे. बऱ्याच खटपटी केल्यावर परवा बी. आर. ला हेमा मालिनीच्या काही डेटस् मिळाल्या आणि त्याने नव्या दमाने सारी उभारणी केली. पण अचानक काही तरी घोटाळा झाला आणि हेमाने 'येणार नाही,' असं कळवलं. आता चोप्रासाहेब पुन्हा एकदा तिच्या तारखा मिळवणाऱ्या निर्मात्यांच्या रांगेत उभे राहिले असून त्यांची 'जळती गाडी' फिल्म सिटी स्टुडिओजमध्ये उभी आहे.

काश्मीरमध्ये शूटिंग करणाऱ्या बऱ्याच युनिटस्ना जरी तिथे सतत वाढणाऱ्या बघ्यांच्या गर्दीमुळे आपलं चंबुगबाळं आटोपतं घ्यावं लागलं तरी राजेंद्रकुमारच्या आर्यन फिल्मस्च्या 'लव्ह स्टोरी'चं युनिट मात्र दीड महिना मॅरेथॉन शूटिंग करून मगच मुंबईला परत आलं.

या चित्रपटातील एका द्वंद्वगीतासाठी आर्ट डायरेक्टर सुधेन्दु रॉय यांनी खास मुंबईहून विमानाने प्लास्टिकची फुलं काश्मीरला नेली होती. कुमार गौरव आणि विजयेता पंडित यांच्यावर चित्रित करण्यात आलेल्या या गीतासाठी सुमारे एक मैल लांबीची दरी या फुलांनी झाकून टाकण्यात आली होती आणि या सगळ्यांसाठी फक्त वीस हजार रुपये खर्च आला!


ऋषी कपूर आणि नीतूसिंग ही अलिकडील काळात गाजलेली प्रेमवीरांची जोडी ३ नोव्हेंबर रोजी विवाहबद्ध होत आहे. तोपर्यंत आपले बहुतेक चित्रपट पूर्ण होतील, असा नीतूचा अंदाज आहे. 'लैला-मजनू, हीर-रांझा, रोमिओ-ज्युलिएट यांनी विवाह करून संसारात पदार्पण केलं असतं तर त्यांनाही आपला चॉइस चुकला असाच साक्षात्कार झाला असता!' असं 'प्रेमा तुझा रंग कसा?' मधला मुलीचा बाप म्हणतो. या विवाहानंतर ऋषी-नीतूला तसं वाटू नये म्हणजे मिळवलं! कारण राखी-गुलझार, जया-अमिताभ, योगिता-किशोरकुमार, प्रीतम-कबीर यांची परंपरा काही फारशी उज्ज्वल नाही. *

कमाल अमरोहींचा 'रझिया सुलताना' प्रत्यक्ष पडद्यावर आल्यानंतर त्याचं कसं स्वागत होईल ते होवो; पण त्याच्या निर्मितीवरच सध्या दोन रिळांचा एक चित्रपट तयार होत असून 'रझिया सुलताना'चा ट्रेलर म्हणून तो पडद्यावर येत आहे. हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात हे प्रथमच घडत आहे. त्याचप्रमाणे या चित्रपटामध्ये जे सेट आणि वस्तू वापरल्या जात आहेत त्यांचंही एक म्युझिअम उभारलं जाणार आहे. अशा तऱ्हेचं भाग्य फक्त साऱ्या जगात गाजलेल्या 'बेनहर' या चित्रपटाच्याच वाट्याला आलं होतं. 'बेनहर'मधील रथांची शर्यत तर निव्वळ अविस्मरणीय होती. त्यातला एक रथ अजूनही स्टीफन बॉइड या नटाच्या बंगल्यासमोरील हिरवळीवर दिमाखाने उभा आहे. *

एकेकाळी एकमेकांचे अतिशय चांगले मित्र असणाऱ्या शत्रुघन-अमिताभमध्ये सध्या चांगलाच वितुष्ट आलं आहे आणि त्यामुळे 'अपराजित' आणि 'तलाक' हे मुकुल दत्त दिग्दर्शन करत असलेले चित्रपट सध्या रेंगाळले आहेत. आता कोणत्याही फिल्ममध्ये अमिताभ-शत्रुघन एकत्र काम करत नाहीत. तसंच अमिताभच्या एका फिल्ममध्ये नुकतंच शत्रुघनऐवजी शशी कपूरला घेण्यात आलं आहे. आपलं शूटिंग रद्द करून अमिताभचे शूटिंग पाहायला जाणाऱ्या रेखाचा तर हा प्रताप (किंवा प्रकोप) नसेल? *

'स्वर्ग-नरक'च्या जोरदार यशानंतर बी. नागी रेड्डी एकदम फॉर्मात आले असून नुकताच त्यांनी दोन नव्या हिंदी चित्रपटांना प्रारंभ केला आहे. त्यातला पहिला नागी रेड्डीच्याच 'गुडम्मा कथा' या गाजलेल्या तेलगू फिल्मचं हिंदी रूपांतर आहे आणि त्यामध्ये शशी कपूर, संजीवकुमार, विद्या सिन्हा, मौसुमी चटर्जी, डॉ. लागू इत्यादी बडे बडे कलाकार काम करत आहेत. या चित्रपटाचं दिग्दर्शन पी. सांबशिवराव करत असून गुलझारच्या गीतांना राकेश रोशन संगीत देत आहेत. *

'तराजू' या नव्या फिल्मची घोषणा बी. आर. चोप्रांनी केली असून ते स्वतःच दिग्दर्शनाचीही बाजू सांभाळणार आहेत. झीनत अमान आणि नवोदित राज बब्बर या फिल्ममध्ये चमकणार आहेत. २३ ऑगस्टला फिल्मचं काम सुरू करून २० सप्टेंबरला ती पूर्ण करून टाकण्याचा चोप्रासाहेबांचा इरादा आहे. त्यांनी जर खरंच तसं केलं तर बी. आर. इशारांना आपल्या चित्रपट काढण्याच्या वेगाचा निश्चितच फेरविचार करावा लागेल. □

हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.
( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

-डॉ. वा. ना. कुबेर

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.